रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । वर्ष ८९ । अंक ७१ । पृष्ठे ८ ▌MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in



रायगड, शनिवार, दि. १६ ऑगस्ट २०२५

# कृषीवल

किंमत ४ ₹




## तिरंगा फडकला डौलानं...




(छायाचित्र : समीर मालोदे)

# भयमुक्त तक्रारीसाठी 'न्याय सारथी'

**जिल्ह्यातील गुन्हेगारांना प्रणालीच्या मदतीने बसणार वेळीच चाप**

**प्रमोद जाधव**
**अलिबाग ।**

भयमुक्त तक्रारीसाठी रायगड पोलिसांकडून आधुनिकतेची मदत घेण्यात आली आहे. आता पीडितांना भयमुक्त तक्रारीसाठी 'न्याय सारथी'चा आधार मिळणार आहे. 'न्याय सारथी' ही प्रणाली पोलीस व नागरिक यांच्यामधील एक दुवा आहे. कृत्रिम बुद्धिमतेचा (एआय) वापर करून ही प्रणाली कार्यान्वित करण्यात आली आहे. मित्राप्रमाणे ही प्रणाली काम करणार आहे. न्याय सारथी हॅलो एआय ॲपचा शुभारंभ स्वातंत्र्यदिनी करण्यात आला आहे.

पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांच्या नेतृत्वाखाली रायगड पोलीस आणि सिमप्लरटुडे.एआय (Simplertoday.ai) यांच्या संयुक्त विद्यमाने न्याय सारथी प्रणाली सुरु करण्यात आली आहे.




काही जण अन्यायाने त्रस्त आणि भीतीपोटी तक्रार देण्यास पुढे येत नाहीत. तसेच काहींना तक्रार कशा पद्धतीने द्यायची, याची माहिती नसते. त्याचा परिणाम गुन्हेगार अधिक बळावून भविष्यात गंभीर परिणाम करण्याची शक्यता असते. अन्यायग्रस्तांना न्याय •> पान २ वर

### अशी आहे प्रक्रिया!

न्याय सारथी प्रणालीचे क्युआर कोड पोलीस ठाण्यात तसेच सार्वजनिक ठिकाणी उपलब्ध आहे. या प्रणालीचा वापर करण्यासाठी raigadpolice-simplertoday-ai ला भेट देणे. मोबाईल, लॅपटॉप, संगणकाचा वापर करून निःसंकोच व निर्भीडपणे घरबसल्या पीडित तक्रार सांगू शकतात, अशी व्यवस्था या प्रणालीद्वारे करण्यात आली आहे. वेब पोर्टल स्वरुपात ही प्रणाली कार्यान्वित आहे. या प्रणालीवर पूर्णपणे सांगितल्यावर विनाविलंब नोंदणीकृत ईमेल व व्हॉट्सॲपवर तक्रारीची प्रत प्राप्त होणार आहे. ती तक्रारीची प्रत पोलीस ठाण्यात जमा झाल्यावर त्याची पोलीस ठाण्यामार्फत पुढील कारवाई केली जाणार आहे.

## आज रायगडला रेड अलर्ट

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्ह्यामध्ये गेल्या काही दिवसांपासून पावसाचे धुमशान सुरू आहे. अनेक ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या, तर काही ठिकाणी मुसळधार पावसाने हजेरी लावली. शुक्रवारीही दिवसभर पावसाची रिपरिप सुरू होती. पावसाचा हाच जोर शनिवारीही कायम राहणार असून, रायगड जिल्ह्याला प्रादेशिक हवामान विभाग, मुंबईने रेड अलर्ट जारी केला आहे. १६ ऑगस्ट रोजी मुंबईसह संपूर्ण कोकणात मुसळधार ते अतिमुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. याचा प्रभाव रायगड जिल्ह्यावर जास्त असणार असून, त्यामुळे रायगडला रेड अलर्ट, तर संपूर्ण कोकणाला ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे. १७ तारखेला संपूर्ण कोकण, मध्य महाराष्ट्र आणि घाट माथ्यासाठी ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आल्याची माहिती, हवामान विभागाने दिली.

**अलिबागमध्ये रंगणार शेकाप पुरस्कृत दहीहंडीचा थरार**

# आज दहीहंडीचा जल्लोष

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

शेतकरी कामगार पक्ष, पुरोगामी युवक संघटना अलिबाग पुरस्कृत प्रशांत नाईक मित्रमंडळ आयोजित अलिबागमध्ये तसेच रायगड जिल्ह्यात ठिकठिकाणी दहीहंडीचा जल्लोष पाहायला मिळणार आहे. जिल्ह्यामध्ये शनिवारी दुपारपासून दहीहंडीचा उत्सव सुरु होणार आहे. आठ हजार ९७९ दहहंड्या फोडल्या जाणार आहेत. यानिमित्ताने ३५५ ठिकाणी मिरवणुका काढून उत्सव साजरा केला जाणार आहे.

दहीहंडीचा उत्सव जिल्ह्यामध्ये मोठ्या प्रमाणात साजरा केला जाणार आहे. आयोजकांमार्फत त्याची तयारी करण्यात आली आहे. गोविंदा पथक दहीहंडी फोडण्यासाठी सज्ज झाले आहेत. दहीहंडी उत्सवामध्ये पुरुष गोविंदा पथकांसह महिला गोविंदा पथकांचा समावेश असणार आहे.

शेकाप पुरस्कृत दहीहंडीचा थरार शनिवारी दुपारपासून सुरु होणार आहे. दहीहंडी स्पर्धेसाठी ५३ गोविंदा पथकाने सहभाग नोंदविला आहे. त्यात महिला गोविंदा पथक २५ आणि पुरुष गोविंदा पथक २८ आहेत. दहीहंडी फोडणाऱ्या पुरुषांच्या अंतिम विजेत्या पथकाला प्रथम क्रमांकाचे रोख एक लाख ३१ हजार १११ रुपये व चषक देऊन गौरविण्यात येणार आहे. पुरुष पथकाच्या पाच थरांच्या सलामीला पाच हजार रुपये, सहा थरांच्या सलामीला अकरा हजार रुपये देण्यात येणार आहे. अंतिम विजेत्या महिला गोविंदा पथकाला प्रथम क्रमांकाचे ५१ हजार १११ रुपये व चषक असे बक्षीस देण्यात येणार आहे. तसेच चार थरांची सलामी देणाऱ्या महिला गोविंदा •> पान २ वर

### दीड हजार पोलिसांचा पहारा

**गोकुळाष्टमीच्या निमित्ताने जिल्ह्यात दीड हजार पोलिसांचा बंदोबस्त असणार आहे. त्यामध्ये १५० पोलीस अधिकारी, ९५० पोलीस कर्मचारी, ३५० होमगार्ड, तसेच वाहतूक कोंडी होऊ नये म्हणून ७३ वाहतूक पोलिसांची मदत घेतली जाणार आहे. जिल्ह्यामध्ये राज्य राखीव पोलीस दलाची एक तुकडी या कालावधीत असणार असल्याची माहिती पोलिसांनी दिली.**

**जिल्ह्यात 8,979 हंड्या फुटणार**



**"रायगड जिल्ह्यामध्ये दहीहंडी उत्सव साजरा करण्यात येणार आहे. गोविंदा पथकांमार्फत थर उभारून दहीहंडी फोडली जाणार आहे. गोविंदा पथकांनी सुरक्षेचा विचार करून हा उत्सव साजरा करावा. आयोजकांनी योग्य पद्धतीने नियोजन करून आनंदमय वातावरणात हा उत्सव साजरा करावा. गैरप्रकार होणार नाही, याची काळजी प्रत्येकाने घेणे आवश्यक आहे.**

**– आंचल दलाल, पोलीस अधीक्षक, रायगड**

# आरसीएफची दुटप्पी भूमिका

**नागरिकांना मर्यादित प्रवेश, पण व्यवसायासाठी मात्र वसाहत खुली**

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

थळ-अलिबाग येथील राष्ट्रीय केमिकल्स ॲण्ड फर्टिलायझर्स (आरसीएफ) वसाहतीमध्ये एका बाजूला नागरिकांना मर्यादित वेळेत पासेसवर प्रवेश देणाऱ्या, तर दुसरीकडे महागड्या भाड्यावर सरकारी वैद्यकीय महाविद्यालयासाठी वसाहतीतील



इमारती खुल्या करण्याच्या आरसीएफ प्रशासनाच्या दुटप्पी भूमिकेला सामाजिक कार्यकर्ते योगेश रामदास मगर व संजय गंगाराम सावंत यांनी माहिती अधिकारामध्ये माहिती मागवून वाचा फोडली आहे. माहिती अधिकारामध्ये मगर यांनी आरसीएफकडे एकूण तीन अर्ज केले होते. त्यापैकी एकाच अर्जाची माहिती आरसीएफने त्यांना दिली असून, •> पान २ वर

## ईव्हीएम घोटाळ्याचा न्यायालयात पर्दाफाश

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

ईव्हीएममध्ये घोटाळा, त्रुटी नाहीत, असा दावा करणाऱ्या मोदी सरकार आणि त्यांच्या निवडणूक आयोगाचा अखेर सर्वोच्च न्यायालयात पर्दाफाश झाला आहे. हरियाणातील एका गावातील सरपंचपद निवडणुकीचा वाद सर्वोच्च न्यायालयात पोहोचला. न्यायालयातच •> पान २ वर

## पनवेल मतदारसंघात ८५,२११ दुबार मतदार

**बाळाराम पाटील यांची माहिती**

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

आज देशभर जो मतचोरीचा मुद्दा गाजतो आहे, तो सर्वात जास्त प्रमाणात १८८ पनवेल विधानसभा मतदारसंघात झालेला आहे. या मतदारसंघामध्ये तब्बल ८५,२११ दुबार मतदारांची नावे नोंदलेली आहेत. त्यापैकी २५,८५५ हे पनवेल मतदारसंघात दोन वेळा मतदार आहेत. पनवेल आणि उरण या दोन्ही विधानसभा



मतदारसंघात २७,२७५ नावे आहेत. पनवेल आणि ऐरोली या दोन मतदारसंघात १६,०९६ मतदार आहेत. पनवेल आणि बेलापूर या मतदारसंघांमध्ये १५,३९७ नावे आहेत. ५८८ मतदारांचा पत्ता कुठेच लागत नाही, •> पान २ वर



# कृषी संशोधन केंद्र जागतिक दर्जाचे होणार


(छायाचित्र : अनिल गवळे)

## डॉ. भारत वाघमोडे यांचे प्रतिपादन

**। वेणगाव । प्रतिनिधी ।**

**आंतरराष्ट्रीय भात संशोधन संस्था, फिलिपाईन्सकडून मोठमोठ्या नाविन्यपूर्ण संशोधन प्रकल्पास मान्यता मिळत असल्याने कर्जतचे कृषी संशोधन केंद्र लवकरच जागतिक दर्जाचे भात संशोधन केंद्र होईल, असे प्रतिपादन सहयोगी संशोधन संचालक डॉ. भारत वाघमोडे यांनी व्यक्त केले. कर्जत येथील प्रादेशिक कृषी संशोधन केंद्राचा वर्धापन दिन मुख्य इमारतीच्या प्रांगणात साजरा करण्यात आला. त्यावेळी मार्गदर्शन करताना ते बोलत होते.**

कार्यक्रमाच्या सुरुवातीला ऐतिहासिक वारसा असलेल्या संशोधन केंद्राच्या मुख्य इमारतीतील कोनशिलेचे पूजन केल्यावर डॉ. वाघमोडे यांनी डॉ. बाळासाहेब सावंत यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण केला. उपस्थितांनीही पुष्पांजली अर्पण करीत विनम्र अभिवादन केले. यानिमित्ताने ३९ वे सहयोगी संशोधन संचालक डॉ. वाघमोडे यांचा कृषिविद्यावेत्ता डॉ. विजय सागवेकर यांनी पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला.

डॉ. भारत वाघमोडे पुढे म्हणाले की, भात जलद पैदास प्रकल्प, महाअन्नपूर्णा-बदलत्या वातावरणानुरूप भातपिकावरील संशोधन प्रकल्प मंजूर झाल्याने जागतिक दर्जाचे संशोधन करण्यासाठी अद्ययावत सुविधा निर्माण होतील. त्यामुळे कोकणातीलच नव्हे तर राज्यातील भात उत्पादक शेतकऱ्यांना याचा फायदा होणार आहे. आता १४ वर्षांऐवजी ६-७वर्षातच वेगवेगळ्या गुणवैशिष्ट्ये असलेल्या भात जाती विकसित करणे शक्य होईल. अद्ययावत भात लागवड तंत्रज्ञान देखील शेतकऱ्यांना उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.देशातील मोजक्याच संस्थांत व महाराष्ट्रात फक्त कर्जत येथेच हा प्रकल्प सुरू होत असल्याचा उल्लेख करीत त्यांनी सर्वांना शुभेच्छा दिल्या.

कृषी विस्तार शिक्षण शास्त्रज्ञ डॉ. रवींद्र मर्दाने यांनी १४ ऑगस्ट १९१९ रोजी स्थापन झालेल्या या संशोधन केंद्राचा देदीप्यमान इतिहास, संशोधित झालेले विविध भात वाण आणि उत्पादनातील योगदान नेटक्या शब्दात विदित केले. सर्व शास्त्रज्ञ, अधिकारी, कर्मचारी व मजूर वर्गाने समर्पित भावनेने काम केल्यास केंद्राचा नावलौकिक जगभरात पोहोचेल, असा विश्वास व्यक्त केला. यावेळी संशोधन केंद्रातील सर्व शास्त्रज्ञ, अधिकारी, कर्मचारी व उपस्थितांना पेढे वाटून आनंद व्यक्त केला.

# इंदापूरमधून बांगलादेशी ताब्यात

## रायगडच्या विशेष पथकाची कारवाई

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्ह्यातील इंदापूर गावातून दोन बांगलादेशींना ताब्यात घेण्यात आले आहे. स्वातंत्र्य दिनाच्या पूर्वसंध्येला रायगडच्या बांगलादेशी विशेष पथकाने ही कारवाई केली.

रायगड जिल्हा औद्योगिक जिल्हा म्हणून ओळखला जातो. जिल्ह्यात वेगवेगळे प्रकल्प उभे राहिले आहेत. या प्रकल्पांमध्ये कामानिमित्त वेगवेगळ्या राज्यांतून कामगार येत आहेत. नोकरी, रोजगाराच्या निमित्ताने जिल्ह्यात ही मंडळी राहात आहेत. त्याचाच फायदा घेत काही बांगलादेशी जिल्ह्यात घुसखोरी करून राहात असल्याची समोर आली आहे. माणगाव तालुक्यातील इंदापूर गावात सहकार नगरमधील दळवी चाळीत बांगलादेशी बेकायदेशीररित्या राहात असल्याची माहिती बांबलादेशी विशेष पथकाला मिळाली.

पोलीस अधीक्षक आंचल दलाल, अपर पोलीस अधीक्षक अभिजीत शिवथरे यांच्या मार्गदर्शनाखाली पथक तयार करण्यात आले. पोलीस उपनिरीक्षक तानाजी वाघमोडे, सहाय्यक फौजदार संजय ठाकूर, पोलीस हवालदार कल्पेश टेमकर, महिला पोलीस हवालदार रसिका तुषार, पोलीस शिपाई श्रेयश म्हात्रे या बांग्लादेशी विशेष पथकाने बुधवारी (दि.१३) छापा टाकला. या छाप्यात माझिदा आलम आणि रसेल हुसेन या दोघांना ताब्यात घेतले. त्यांची चौकशी केल्यानंतर ते बांगलादेशी असल्याचे निष्पन्न झाले. त्यांनी चोरट्या मार्गाने घुसखोरी करून भारतात प्रवेश केला. त्यानंतर रायगड जिल्ह्यातील माणगाव तालुक्यातील इंदापूर गावात एका चाळीमध्ये चार महिन्यांपासून राहात होते. गवंडी, मेस्त्रीच्या हाताखाली काम करत होते. त्यांची लवकरच बांगलादेशामध्ये रवानगी केली जाणार आहे.

### पथकाची नजर

रायगड जिल्ह्यामध्ये घुसखोरी करून बांगलादेशी वास्तव्य करीत असल्याचा प्रश्न गंभीर निर्माण झाला आहे. त्यामुळे या घुसखोरांवर लक्ष ठेवण्यासाठी जिल्ह्यात बांगलादेशी विशेष पथक कार्यान्वित करण्यात आले आहे. या पथकाद्वारे जिल्ह्यातील घुसखोरांवर नजर राहणार आहे.



# विहिरीवरच्या दहीहंडीची ३३ वर्षांची थरारक परंपरा

**। उरण । प्रतिनिधी ।**

गोकुळाष्टमी म्हणजे मानवी मनोरे, हंडी, थरार आणि जल्लोष! पण, रायगडच्या कुर्डूस गावात हा जल्लोष अक्षरशः विहिरीवर रंगतो. १९९२ पासून सुरू झालेली ही अनोखी परंपरा आज ३३ व्या वर्षात पदार्पण करतेय, आणि विशेष म्हणजे या थरारात आजवर एकाही गोविंदाला इजा झालेली नाही.

देऊळआळी परिसरातील पिंगळे, पाटील, शेरमकर, थळे आणि केणी या कुटुंबातील धाडसी तरुणांनी १९९२ साली ही वेगळी दहीहंडी सुरू केली. सुरुवातीला सीताफळीच्या झाडाच्या आधाराने प्रयत्न, नंतर विहिरीच्या कठड्यावर थर, आणि शेवटी हंडीकडे झेप! गोविंदाने हात लावताच हंडी 'फुटली' मानली जाते, नंतर ती खाली उतरवून विहिरीत फोडली जाते. त्यानंतर सर्व गोविंदांची विहिरीत उडी आणि जल्लोषाचा महापूर असा असतो.

मुंबई, पुणे आणि राज्यभरातून पथके येथे धाव घेतात. गेल्या वर्षी आकाश पिंगळेने सलग पाचव्यांदा हंडी फोडून विक्रम केला. यंदा १६ ऑगस्टला दुपारी १२ वाजता पूजा व पालखी सोहळ्यानंतर हा थरार रंगणार आहे, अशी माहिती आयोजक पराग पिंगळे यांनी दिली. कुर्डूसची विहिरीवरील दहीहंडी ही आता फक्त खेळ किंवा स्पर्धा नसून धाडस, परंपरा आणि एकतेचा उत्सव बनली आहे.

# दोन अपघातात दोघेजण जखमी

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

पनवेल परिसरात झालेल्या दोन अपघातात दोघेजण जखमी झाल्याची घटना घडली आहे. पनवेल येथे कंटेनरने धडक दिल्याने टेम्पोचालक आत्माराम फुलतावरकर हे जखमी झाले. अपघातात आत्माराम यांना पायाला गंभीर दुखापत झाली असून, सध्या त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात कंटेनरचालकावर गुन्हा दाखल केला आहे. तर, दुसऱ्या अपघातात पनवेल येथील नवीन पुलावर एर्टिगाकारने एक दुचाकीला धडक दिल्याने ५३ वर्षीय सीएम वासुदेवन जखमी झाले. ते नेरूळहून उलवे येथे दुचाकीवर कामासाठी जात होते. या अपघातात त्यांचा डावा खांदा फॅक्चर झाला असून, त्यांना नेरूळ येथील रुग्णालयात दाखल केले आहे. याप्रकरणी पनवेल शहर पोलिसांत गुन्हा दाखल आहे.

# रस्त्याला वनखात्याचा हिरवा कंदील

## पोलिसांनी आदिवासी कार्यकर्त्यांना दिले परवानगीचे पत्र

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यातील माथेरान डोंगर रांगेमधील मंजूर असलेल्या रस्त्याच्या कामाला अखेर वन विभागाने हिरवा कंदील दाखवला आहे. जुम्मापट्टी ते किरवली वाडी या रस्त्याच्या कामाचे भूमीपूजन करण्यात आले होते. मात्र, वन विभाग रस्त्यासाठी जमीन देत नव्हते. त्यामुळे रस्त्याचे काम सुरू व्हावे म्हणून आत्मदहन करण्याचा इशारा देणारे आदिवासी कार्यकर्ते यांच्या गेली अनेक वर्षे सुरू असलेल्या आंदोलनाला यश आले आहे.

वन विभागाची अलिबाग जिल्हा कार्यालयाने या रस्त्याच्या कामाला वन जमीन दिली असून, ते पत्र प्रशासनाचे वतीने आदिवासी कार्यकर्ते यांना देण्यात आले.

देश स्वतंत्र काळापासून माथेरान डोंगर रांगेत असलेल्या किरवली वाडी ते जुमापट्टी या भागातील १२ आदिवासी वाड्यांना जोडणारा रस्ता शासन करीत



नव्हते. वन विभागाच्या मालकीची जमीन मिळत नसल्याने शेवटी स्थानिक पातळीवर आदिवासी कार्यकर्त्यांनी अनेक वर्षे आंदोलने केली आहेत. तर, स्वातंत्र्यदिनाच्या दिवशी आदिवासी कार्यकर्ते जैतू पारधी आणि गणेश पारधी यांनी नेरळ येथील हुतात्मा चौक येथे आत्मदहन करण्याचा इशारा दिला होता.

रस्त्याचे काम मंजूर करणारे आमदार महेंद्र थोरवे यांनी आदिवासी कार्यकर्त्यांच्या आक्रमक भूमिकेनंतर वन विभागाचे कर्जत येथील वन क्षेत्रपाल समीर खेडेकर आणि जिल्हा उपवन संरक्षक राहुल पाटील यांच्या सोबत मॅरेथॉन बैठका घेऊन जुम्मापट्टी ते किरवली वाडी या रस्त्याच्या वन जमिनीचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी मोठे प्रयत्न केले. वन विभागाने आपले राखीव वन या रस्त्यासाठी दिले असून १२ आदिवासी वाड्या जोडण्यासाठी १२ किलोमीटर लांबीच्या रस्त्यासाठी दोन स्वतंत्र प्रस्ताव मंजूर करून घेतले.

वन विभागाने रस्त्यासाठी दिलेल्या जमिनीवर कोणत्याही प्रकारचे वृक्षतोड करण्यास बंदी असून, रस्ता झाल्यानंतरदेखील राखीव वन क्षेत्र हे वैधानिक नाव कायम राहणार असल्याचे १४ ऑगस्ट रोजी देण्यात आलेल्या मंजुरी पत्रात नमूद केले आहे.

# विद्यार्थ्यांना बूट, सँडलचे वाटप

**पनवेल :** लायन्स क्लब ऑफ पनवेल सरगमतर्फे शिरढोण येथील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके विद्यालय येथील ८१ आदिवासी विद्यार्थ्यांना बूट आणि सँडल्स वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक श्री. तिरमाले यांनी केले. सरगम क्लबचे अध्यक्ष प्रेमेंद्र बहिरा यांनी सांगितले की, सलग तीन वर्षे सरगम क्लबतर्फे या शाळेत विविध उपक्रम आयोजित करण्यात आले आहेत आणि शाळेतर्फे नेहमीच क्लबच्या उपक्रमांना सहकार्य मिळते. ला. मिलिंद जोशी यांनीसुद्धा विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. याप्रसंगी लायन्स क्लब ऑफ पनवेल सरगमचे अध्यक्ष प्रेमेंद्र बहिरा, सहसचिव ओंकार खेडकर, सहखजिनदार अनिल परमार, मिलिंद जोशी, शाळेचे मुख्याध्यापक तिरमाले सर, मोपरे सर, डी.के. पाटील, गुंजाळ सर, वेळेकर सर, पाटील सर व सर्व शिक्षक शिक्षकेतर सहकारी उपस्थित होते.

# रेवस-करंजा रो-रो प्रकल्प रद्द?

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

जल मार्गावरील प्रवासाचे अंतर कमी करण्यासाठी रेवस-करंजा रो-रो प्रकल्पाचे काम करण्यात आले आहे. या ठिकाणी वेगवेगळ्या सुविधा उपलब्ध करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. यासाठी २५ कोटी रुपये खर्च झाले असूनही रो-रो सेवा सुरू नाही. त्यामुळे हा प्रकल्प रद्द अथवा अनिश्चित काळासाठी स्थगित होण्याच्या मार्गावर असल्याचे संकेत दिसत आहेत.

सागरमाला योजनेतून हा रेवस-करंजा रो-रो प्रकल्पाचे काम करण्यात आले आहे. यासाठी २५.७ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली. त्यामध्ये केंद्र शासनाकडून सुमारे २० कोटी रुपये आणि उर्वरित रक्कम राज्य शासन व स्थानिक प्राधिकरणांकडून बजेटमध्ये मंजूर केला.

या प्रकल्पामध्ये रेवस येथे जेटी बांधकाम, ब्रेकवॉटर, ड्रेजिंग, विजेची व प्रकाशव्यवस्था आणि वाहनतळ व जोडरस्त्यांची भौतिक कामे करण्यात आली आहेत. प्रवासी आणि वाहनांसाठी रेवस-करंजा दरम्यान जलवाहतूक (रो-रो) सेवा सुरू करण्यासाठी हा प्रकल्प उभारण्यात आला. गेल्या सात वर्षांपासून रेवस येथील रो-रो जेटीचे बांधकाम सुरु आहे, पण ठेकेदाराकडून दुर्लक्ष आणि कामाच्या दीर्घ स्थगितीमुळे लोखंडी सांगाडा समुद्रात उभारण्यासाठी टाकण्यात आला होता, तो गंजून समुद्रात बुडण्याच्या मार्गावर आहे. या सुविधेची देखभाल न केल्याने मोठ्या आर्थिक आणि भौतिक हानीची भीती निर्माण झाली आहे. प्रकल्प रद्द किंवा अनिश्चित काळासाठी स्थगित करण्याचा प्रस्ताव चर्चेत असल्याने सार्वजनिक निधीचा अपव्यय होण्याची भीती आहे, अशी चिंता सामाजिक कार्यकर्ते संजय सावंत यांनी मंत्री बंदरे यांना लिहिलेल्या पत्रात व्यक्त केली आहे. या प्रकल्पावर झालेला खर्च वसूल करण्यासाठी आणि दोषींवर योग्य ती कारवाई करण्यासाठी महाराष्ट्राच्या बंदरे व मत्स्यवसाय मंत्री नितेश राणे यांना पत्र देण्यात आले आहे.

प्रकल्पाची उच्चस्तरीय चौकशी करून टेंडर प्रक्रिया, निधी खर्च, प्रगती अहवाल आणि मंजुरीतील विलंब तपासावा, प्रकल्पाच्या विलंबासाठी दोषी असलेल्या कंत्राटदार, सल्लागार आणि अधिकाऱ्यांची नावे जाहीर करून त्यांच्यावर योग्य ती कायदेशीर कारवाई करावी, शासनाचा खर्च, सुमारे २५ कोटी रुपये नुकसानभरपाई स्वरूपात दोषी पक्षांकडून वसूल करावा, तांत्रिक आणि पर्यावरणीय अडथळे दूर करून किंवा पर्यायी आराखड्याद्वारे प्रकल्प पुन्हा गतिमान करण्यासाठी तत्पर निर्णय घ्यावा, असे सांगण्यात आले आहे.

### कंत्राटदाराचा मक्ता रद्द

रेवस-करंजा रोरो प्रकल्पाचे काम सागर माला योजनेंतर्गत प्रगतीपथावर सुरु आहे. २५.७ कोटी रुपयांचा खर्च या प्रकल्पासाठी करण्यात आला आहे. ६७ टक्क्यांपेक्षा अधिक काम प्रकल्पाचे झाले आहे. मात्र, काही कारणास्तव कंत्राटदाराचा मक्ता रद्द करण्यात आला आहे. सुधारित प्रशासकिय मान्यतेचा प्रस्तावर १५ एप्रिल २०२४ मध्ये शासनाला सादर करण्यात आल्याची माहिती उपलब्ध झाली आहे.

# मनसेच्या कार्यकर्त्यांवर गुन्हा

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या चार-पाच कार्यकर्त्यांनी पनवेल महापालिकेने नवी मुंबई विमानतळ लिहिलेल्या फलकांवर काळा स्प्रे मारून तो विद्रूप केला. हा प्रकार आदई सर्कल आणि एचडीएफसी सर्कलदरम्यान घडला.

याची माहिती मिळताच खांदेश्वर पोलीस ठाण्यात पाच मनसे कार्यकर्त्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पालिकेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या सूचनेनुसार रोशन रमाकांत माळी यांनी याबाबत पोलिसांत तक्रार दिल्यावर हा गुन्हा दाखल करण्यात आले. फलकाचे विद्रुपीकरण कोणत्या कारणाने केले याची अद्याप पोलिसांकडून स्पष्टीकरण देण्यात आले नाही. मात्र, कारवाई केल्याचे त्यांनी सांगितले.

# अमली पदार्थ विरोधी जनजागृती मोहीम

**। पनवेल । प्रतिनिधी ।**




अमली पदार्थ विरोधी जनजागृती मोहिमेंतर्गत शुक्रवार, दि. १५ ऑगस्ट रोजी खांदेश्वर पोलीस ठाणे हद्दीमध्ये विविध प्रमाणे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यक्रमात वपोनि स्मिता ढाकणे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार यांनी सहभाग घेतला होता. या कार्यक्रमादरम्यान अधिकाऱ्यांनी अमली पदार्थाचे दुष्परिणाम याबाबत जनतेला माहिती देऊन जनजागृती केली.

या अंतर्गत येथील सीकेटी कॉलेज खांदा कॉलनी ते खांदेश्वर पोलीस ठाणे येथे मानवी साखळी व पायी रॅलीत ११० विद्यार्थी शिक्षक व पो. अधिकारी व अंमलदार यांचा सहभाग होता. त्यानंतर खांदेश्वर पोलीस ठाणे येथील सायकल रॅलीत रोटरी क्लब सहभाग होता. त्यानंतर रायन स्कूल सेक्टर ११ येथे जनजागृती अभियान राबविण्यात आले, तसेच एनएमएमटी बस डेपो आसुडगाव येथे जनजागृती अभियान त्याचप्रमाणे सेंट जोसेफ स्कूल, सेक्टर-७, नवीन पनवेल येथे जनजागृती अभियान, तर पनवेल रेल्वे स्टेशन येथे जनजागृती अभियान तसेच आदई ग्रामपंचायत येथे, बालाजी स्प्लेंडर फेज २, आदई येथे अष्टविनायक गृह संकुल फेज २ सोसा. आदई येथे सन बेन सोसायटी आसुडगाव, पुष्प विनायक कॉम्प्लेक्स आदई गाव येथेसुद्धा अमली पदार्थ विरोधी जनजागृती मोहीम राबविण्यात आली. याला उपस्थितांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिल्याची माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक स्मिता ढाकणे यांनी यावेळी दिली.

## पान १ वरून

### आज दहीहंडीचा जल्लोष

पथकाला पाच हजार रुपये व पाच थरांची सलामी देणाऱ्या पथकाला अकरा हजार रुपये देऊन सन्मानित केले जाणार आहे. दहीहंडी उत्सवानिमित्त रिल्स स्पर्धा आयोजित केली आहे. या स्पर्धेसाठी ३३ जणांनी नोंदणी केली असल्याचे सांगण्यात आले. अलिबाग नगरपरिषदेच्या माजी नगराध्यक्षा स्व. नमिता नाईक यांच्या स्मरणार्थ दहीहंडी फोडणाऱ्या शहरातील पुरुष व महिला गोविंदा पथकाला विशेष पारितोषिक देण्यात येणार आहे. अलिबाग नगरपरिषद हद्दीतील पुरुष गोविंदा पथकाने दहीहंडी फोडल्यास त्या पथकाला एक लाख रुपये आणि महिला गोविंदा पथकाला ५० हजार रुपयांचे अतिरिक्त पारितोषिक देण्यात येणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली.

**साध्या वेशात असणार पोलीस**

रायगड जिल्ह्यामध्ये नऊ हजार दहीहंड्या फोडल्या जाणार आहेत. त्यामुळे याठिकाणी प्रचंड गर्दी होणार आहे. हा उत्सव पाहण्यासाठी महिला, पुरुष, तरुण मंडळी, तसेच राजकीय, सामाजिक, शैक्षणिक अशा सर्वच क्षेत्रातील मंडळी उपस्थित राहणार आहेत. गर्दीचा फायदा घेत महिलांची छेडछाड करणाऱ्यांवर लक्ष ठेवण्यासाठी पोलिसांनी कडक पावले उचलली आहेत. प्रत्येकाच्या संशयित हालचालीवर लक्ष ठेवण्याचे काम केले जाणार आहे. कायदा व सुव्यवस्था बिघडू नये म्हणून साध्या वेशात गर्दीमध्ये पोलीस तैनात राहणार आहेत.

### भयमुक्त तक्रारीसाठी 'न्याय सारथी'

देण्यासाठी रायगड पोलिसांनी कृत्रिम बुद्धिमत्तेची (एआय) मदत घेतली आहे. त्यासासाठी 'न्याय सारथी' ॲप सुरु करण्यात आला आहे. नागरिकांना होणारा त्रास, तसेच तक्रार कायदेशीर पद्धतीने, वेळेत पोलिसांकडे या प्रणालीचा वापर करून पोहोचविणे शक्य होणार आहे. त्यामुळे गुन्हेगाराला वेळीच चाप बसण्यास मदत होणार आहे.

### आरसीएफची दुटप्पी भूमिका

उर्वरित दोन अर्जांवर माहिती न मिळाल्याने मगर यांनी प्रथम अपील दाखल केले आहे. आरसीएफ वसाहतीत बाहेरील नागरिकांना प्रवेशासाठी नेहमीच कडक सुरक्षा तपासणी व अडथळे असतात. नागरिक, स्थानिक पत्रकार आणि काही माजी कर्मचाऱ्यांनाही विनापरवानगी ये-जा करण्यास बंदी असते. सामाजिक-कार्यार्थ किंवा सार्वजनिक भेटींसाठीही आरसीएफ प्रशासनाकडून खुलेपणाचा अभाव दिसून येतो, असा आक्षेप मगर यांनी घेतला आहे.

नागरिकांच्या प्रवेशावर निर्बंध घालून नागरिकांना मर्यादित प्रवेश देणाऱ्या आरसीएफ प्रशासनाने याच वसाहतीत शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अलिबाग यासाठी मोठ्या प्रमाणावर तब्बल १४ इमारती (१४३ सदनिका), ३ इमारती, जुनी शाळा (१२ खोल्या) आणि ६ एकर मोकळी जागा यासारख्या मालमत्तांचा वापर व्यापारी/व्यावसायिक दराने तीन वर्षांच्या कराराने दिला गेला आहे. विद्यार्थ्यांच्या वसतिगृह, प्रयोगशाळा, शैक्षणिक विभागांसाठी प्रति मुख्य सदनिका हजारोंच्या भाड्याने आणि दरवर्षी वाढीच्या कराराने हे व्यवहार सुरू आहेत. सामाजिक कार्यकर्ते योगेश मगर यांच्यासह संजय सावंत यांनी या विरोधाभासावर बोट ठेवले आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, आरसीएफ प्रशासनाच्या धोरणात पारदर्शकता नाही. वसाहत 'हाय सिक्युरिटी' असल्याचा दाखला देऊन स्थानिक नागरिकांना, सामाजिक प्रतिनिधींना प्रवेश नाकारला जातो. मात्र, व्यावसायिक लाभासाठी तीस-चाळीस लाखांच्या सरकारी व्यवहारांना मोकळीक देणे ही 'दुटप्पी' आणि निवडक भूमिकाच आहे. गरीब, आजारपणामुळे त्रस्त सामान्य नागरिकांना किंवा नागरी उपक्रमांसाठी वसाहतीच्या सुविधा बंद, पण प्रचंड भाडे मोबदल्यात व्यवसायाला 'ग्रीन सिग्नल' दिला जातो.

शासन आदेशानुसार, वसाहतीतील -विद्यार्थी वसतिगृहासाठीः प्रति विद्यार्थी, प्रति सेवमास्टर रू.२,५००/-, तीन वर्षांसाठी (दरवर्षी १० टक्के वाढ), प्रयोगशाळा/शैक्षणिक वापरास : प्रति सदनिका रू.८,२९०/- प्रतिमाह वीज : रू.१३.१९ प्रति युनिट (जीएसटी टॅक्ससह), वार्षिक खर्च सुमारे १६ लाख या सगळ्यांसाठी हजारो-लाखो रुपये थेट शासकीय निधीतून आरसीएफ प्रशासनाच्या खात्यात जमा होत आहेत, पण सामान्य नागरिक, स्थानिक माध्यम प्रतिनिधी, गरजूंना सुरक्षा, परवानगी, नियमांची आडकाठी दिसून येते. शासकीय प्रकल्प असला तरी यात मोठ्या प्रमाणावर व्यावसायिक फायदा आरसीएफला मिळतो. जे नागरिकांसाठी 'प्रतिबंधीत' ते सरकारी व्यवहारांसाठी खुले का? असा सवाल योगेश मगर यांनी विचारला आहे. मगर यांनी भूमिका बदलणारा 'दुटप्पी' व्यवहार थांबवा, शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाला अथवा आरसीएफला विरोध नाही, पण वसाहतीतील खुलेपणा आणि सोयी सर्वांसाठी उपलब्ध करा, अशी मागणी योगेश मगर यांनी केली आहे. या प्रकारावर आरसीएफ प्रशासनाकडून ठोस खुलासा मिळालेला नाही.

प्रशासनाने सुरक्षिततेचा दाखला देत, व्यवहार फक्त शासकीय यंत्रणेसोबत असल्याचे सांगितले. पण, सामाजिक-सार्वजनिक सुरक्षेचा निकष फक्त नागरिकांवर कडक उपाय तर व्यवहारांना सवलत, अशी भूमिका स्पष्टपणे उघड होत आहे. आरसीएफच्या वसाहतीमधील नागरिकांना मर्यादित प्रवेश देणे, पण सरकारी प्रकल्पांसाठी कोट्यवधींच्या व्यवहाराने वसाहत खुली ठेवणे हा दुजाभाव, व्यापारी दृष्टीकोन आणि पारदर्शकतेचा अभाव आहे. सामाजिक कार्यकर्त्यांच्या निदर्शनामुळे या विरोधाभासावर आता स्थानिक चर्चेला उधाण आले आहे.

**शाळा, सदनिका भाड्याने**

नागरिकांच्या प्रवेशावर निर्बंध घालून नागरिकांना मर्यादित प्रवेश देणाऱ्या आरसीएफ प्रशासनाने याच वसाहतीत शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अलिबाग यासाठी मोठ्या प्रमाणावर तब्बल १४ इमारती (१४३ सदनिका), ३ इमारती, जुनी शाळा (१२ खोल्या) आणि ६ एकर मोकळी जागा यासारख्या मालमत्तांचा वापर व्यापारी/व्यावसायिक दराने तीन वर्षांच्या कराराने दिला गेला आहे. विद्यार्थ्यांच्या वसतिगृह, प्रयोगशाळा, शैक्षणिक विभागांसाठी प्रति मुख्य सदनिका हजारोंच्या भाड्याने आणि दरवर्षी वाढीच्या कराराने हे व्यवहार सुरू आहेत.

### पनवेल मतदारसंघात ८५,२११ दुबार मतदार

अशी नावे नोंदलेली आहेत, अशी माहिती शेकापचे नेते तथा माजी आ. बाळाराम पाटील यांनी दिली.

ते म्हणाले की, एकूण ८५,२११ दुबार मतदार आम्हाला सापडल्यानंतर या विषयावर आम्ही निवडणूक निर्णय अधिकारी (एस.डी.ओ.) पनवेल, तहसीलदार पनवेल तसेच निवडणूक अधिकारी आणि जिल्हाधिकारी यांना कल्पना दिली. त्यांना निवेदन देऊन सांगितले की, मोठ्या प्रमाणात बोगस मतदार नोंदले गेले आहेत, त्यांना फिल्टर करा. त्यांच्याकडून कोणताही प्रतिसाद न मिळाल्यामुळे आम्ही शेवटी १० सप्टेंबर २०२४ रोजी निवडणूक अधिकाऱ्यांकडे तक्रार केली. १ ऑक्टोबर २०२४ रोजी आम्ही मुंबई उच्च न्यायालयात गेलो आणि सिव्हिल रिट पिटीशन क्र. १३७७८/२०२४ दाखल केली. ०७/१०/२०२४ रोजी उच्च न्यायालयाने ही याचिका ऐकली आणि ११/१०/२०२४ रोजी निकाल देऊन १८८ विधानसभा मतदारसंघातून ही नावे कमी करण्याचा आदेश निवडणूक अधिकाऱ्यांना दिला. परंतु, या निकालाची कुठलीही दखल निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी घेतली नाही. आम्ही त्यांना निकालाची प्रत देऊन कारवाई करण्यासाठी निवेदन दिले होते; परंतु कोणतीही दाद मिळाली नाही. परिणामी, ही नावे मतदारयादीत तशीच राहिली.

त्यानंतरही मी पनवेलचे उपविभागीय अधिकारी आणि तहसीलदारांची भेट घेऊन मोठ्या प्रमाणात दुबार व बोगस मतदार या मतदारसंघात असल्याचे सांगितले. त्यांच्यावर वगळण्याची कारवाई होत नसल्यास, किमान त्यांचे मतदान होऊ नये यासाठी काहीतरी व्यवस्था करण्याची विनंती केली. तरीही कोणतीही कारवाई झाली नाही. या मतदारसंघात ११,६०० मतदारांनी दुबार मतदान केले आहे. नमुना दाखल काही फोटोही आम्ही जुळवलेले असून, विधानसभा मतदारसंघांमध्ये दुबार मतदान झालेले आहे, हे स्पष्ट दिसते, असे बाळाराम पाटील यांनी सांगितले.राहुल गांधींनी हा विषय घेतला आहे आणि ते सुरुवातीपासून जे म्हणत होते ते तंतोतंत खरं आहे. वोट चोरी नक्कीच झालेली आहे आणि महाराष्ट्राचा निकाल ही अशी वोट चोरी करूनच मिळवला आहे, असा आरोप पाटील यांनी केला आहे.

दुबार मतदारांविरुद्ध हायकोर्टाच्या निकालानंतरही कारवाई होत नसेल, तर संबंधित निवडणूक यंत्रणा व अधिकाऱ्यांना जबाबदार धरले पाहिजे. संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई झाली पाहिजे. आम्ही पुन्हा एकदा हायकोर्टाची पायरी चढण्याचा निर्धार केला आहे. राहुल गांधी जे बोलतात ते तंतोतंत खरं आहे आणि पनवेलसारखा ठळक पुरावा दुसरीकडे मिळणार नाही. पनवेलमध्ये याचा अगदी उच्चांक झाला आहे, कहर झाला आहे. साऱ्यांनी याची दखल घ्यावी आणि राहुल गांधींनी जी मोहीम निवडणूक आयोगाला जागं करण्यासाठी चालू केली आहे, त्याला सहकार्य करावे. कारण महाराष्ट्राचे मुख्य निवडणूक अधिकारी, भारताचे निवडणूक आयोग, जिल्हा निवडणूक अधिकारी किंवा १८८ पनवेल विधानसभा मतदारसंघाचे निवडणूक अधिकारी कोणाच्याही लक्षात ही गोष्ट घेतली गेली नाही. लोकशाहीची हत्या करण्यामागे या सर्वांचा सहभाग आहे, हे ठळकपणे दिसून येते. एकाच मतदारसंघात दोन वेळा मतदान करणारे ११,६०० मतदार सापडलेले आहेत, अशी माहिती बाळाराम पाटील यांनी दिली.

### ईव्हीएम घोटाळ्याचा न्यायालयात पर्दाफाश

फेरमतमोजणी झाली आणि चक्क पराभूत उमेदवार विजयी झाला. दरम्यान, देशात पहिल्यांदाच ईव्हीएमचा भंडाफोड झाला असून, बॅलेट पेपरवर निवडणुका घेण्याचा मुद्दा पुन्हा पुढे आला आहे.हरियाणातील पानिपत जिल्ह्यातील बुआना लाखू गावातील सरपंचपदाची निवडणूक २ नोव्हेंबर २०२३ रोजी झाली होती. त्यात कुलदीप सिंह यांना विजयी घोषित करण्यात आले. मात्र, पराभूत उमेदवार मोहित कुमार यांनी मोठी न्यायालयीन लढाई दिली. हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात आले. ईव्हीएममधील मतांची मोजणी न्यायालयाच्या देखरेखीखाली करण्यात आली आणि निकाल फिरला. पराभूत उमेदवार मोहित कुमार विजयी झाले. ११ ऑगस्ट रोजी न्यायमूर्ती सूर्य कांत, न्यायमूर्ती दीपंकर दत्ता आणि न्यायमूर्ती कोटिश्वर सिंह यांच्या खंडपीठाने ऐतिहासिक निकाल दिला. मोहित कुमार यांना विजयी घोषित करून त्यांची तात्काळ सरपंचपदी नियुक्ती करण्याचे आदेश जिल्हा प्रशासनाला दिले.

पनवेल महानगरपालिका
जनहित: परम् ध्येयम् | स्थापना - २०१६

# पनवेल महानगरपालिका

## मालमत्ता कर विभाग

अभय योजना

**केवळ एक वेळची विशेष व अंतिम बाब, करदात्यांसाठी सुवर्णसंधी !!!**

# अभय योजने अंतर्गत शास्ती माफीला मुदतवाढ

## मालमत्ता कर एकरकमी भरा व शास्तीवर सवलत मिळवा !

१६ ऑगस्ट ते १५ सप्टेंबर २०२५ पर्यंत शास्ती मध्ये ९०% सवलत.

१६ ते ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत शास्ती मध्ये ७५% सवलत.




पनवेल महानगरपालिकेच्या panvelmc.org या संकेतस्थळावर जाऊन नागरीक आता मालमत्ता कराच्या विविध सेवाकरीता "पीएमसी कर मित्र" या प्रणालीचा वापर करू शकतात. मालमत्ता कराचा भरणा, तक्रारी, अभिप्राय व सुचना "पीएमसी कर मित्र" या चॅटबॉट च्या माध्यमातून नोंदविता येतील. नागरिकांनी आता मालमत्ता कराच्या विविध सेवाकरीता रांगेत उभे न राहता ऑनलाईन स्वरूपात "पीएमसी कर मित्र" या प्रणालीचा वापर करावा असे आवाहन आयुक्त तथा प्रशासक श्री. मंगेश चितळे यांनी केले आहे.

**चालू वर्ष २०२५-२६ करिता ३१ ऑगस्ट २०२५ पर्यंत कराचा संपूर्ण भरणा करा, ५% सूट हमखास मिळवा.**

**E-Bill स्वीकारा, डिजिटल भरणा करा वेळ वाचवा, २% सूट घेऊन बचत वाढवा!**

ऊर्जा बचत करा सौर शक्तीने, आणि करामध्ये घ्या २% सूट!

जल पुनःभरणाचा अवलंब करा, २% सूट सहज मिळवा!

घनकचरा शास्त्रोक्त पद्धतीने हाताळा, सवलतींचं दार उघडा आणि करात २% सूट मिळवा!

कचऱ्याची शिस्तबद्ध विल्हेवाट करा, मिळवा २% करामध्ये सवलत हमखास!

डिजिटल युगात स्मार्ट निर्णय पारंपरिक रांगा सोडा, PMC Tax App & Panvel Connect App वरून घरबसल्या कर भरा!

वेळ वाचवा, panvelmc.org वरून कर ऑनलाईन भरा आणि मालमत्ता करामध्ये सवलती मिळावा.

**मंगेश चितळे**
आयुक्त तथा प्रशासक,
**पनवेल महानगरपालिका**
स्वामी नित्यानंद रोड, गोखले हॉल जवळ पनवेल - 410206

## लाल किल्ल्यावरून प्रचार

पहलगामचा हल्ला व ऑपरेशन सिंदूर नुकतेच घडून गेलेले असल्याने पंतप्रधानांच्या लाल किल्ल्यावरच्या भाषणात त्याचेच पडसाद जास्त असणार हे उघड होते. शुक्रवारी ७९व्या स्वातंत्र्यदिनी नरेंद्र मोदी यांनी सलग बाराव्यांदा पंतप्रधान म्हणून झेंडा फडकावला व भाषण केले. त्यात त्यांनी पाकिस्तानला अनेक प्रकारे इशारे दिले. दहशतवाद्यांबरोबरच त्यांना पोसणाऱ्यांनाही भारत धडा शिकवेल असे ते म्हणाले. हीच भूमिका आजवरचे सर्व काँग्रेसी व बिगरकाँग्रेसी पंतप्रधान मांडत आले आहेत. त्या त्या वेळच्या स्थितीनुसार पाकिस्तानला जरब बसवण्याचा प्रयत्नही केला गेला आहे. पण आजवर इतिहासात जे काय घडले त्या चुका होत्या आणि आपण त्या सुधारत आहोत असा एकूण मोदींचा आविर्भाव असतो. त्यांच्या भक्तांना हेच ऐकायचे असते. मग त्यांना व्हॉटसॅपवरून खोट्यानाट्या गोष्टी प्रसृत करता येतात. त्यानुसार सिंधूवाटप करारावर आगपाखड करून मोदींनी आपल्या भक्तांना व गोदी मिडियाला खाद्य पुरवले आहे. काश्मिरात उगम पावणाऱ्या नद्यांचे पाणी पाकिस्तानात जाते. पण हा सर्व डोंगराळ प्रदेश आहे. तेथे धरणे बांधून हे पाणी अडवणे शक्य नाही. कारण तसे केले तर काश्मिरातील मोठा प्रदेश पाण्याखाली जाईल. सध्या आहे तेच पाणी शेतकऱ्यांपर्यंत पोचत नाही अशी स्थिती आहे. ते पोचवणे याला खरे प्राधान्य द्यायला हवे. पण नेहरु-इंदिरा, काँग्रेस इत्यादींवर खोटी टीका केली की आपण अधिक देशभक्त असल्याचे आपोआप सिद्ध होते असे भाजप संप्रदायाला वाटते. पंतप्रधान हे खरे तर देशाचे असतात. त्यातही स्वातंत्र्यदिनानिमित्तच्या बोलताना पक्षीय गोष्टी बाजूला ठेवून सर्वांना बरोबर घेऊन जाणारे भाषण व्हावे, अशी अपेक्षा असते. पण मोदींकडून ती अपेक्षा करणे व्यर्थ आहे हे त्यांनी काल पुन्हा सिध्द करून दाखवले. दुसरे असे की, सर्व नद्यांवर केवळ आपणच हक्क सांगू असे होत नाही. त्याच न्यायाने तिबेटमध्ये उगम पावणाऱ्या ब्रह्मपुत्रा नदीचे सर्व पाणी उद्या चीन अडवू शकतो. पण आंतरराष्ट्रीय संकेत, सभ्यता आणि माणुसकी नावाची काही गोष्ट असते. त्यानुसारच भारताने पूर्वी हा करार केला होता. तो स्थगित करणे कितपत न्याय्य व कायदेशीर आहे याबाबत शंका आहेतच.

### पाकिस्तानला इशारा

पाकिस्तानच्या अणुयुद्धाच्या धमक्यांना आपण भीक घालत नाही याचा त्यांनी पुनरुच्चार केला. ते ठीक. परंतु या निमित्ताने पाकिस्तानला पाठीशी घालणाऱ्या अमेरिकेलाही त्यांनी थेटपणे चार शब्द सुनावले असते तर ते अधिक बरे झाले असते. पाकिस्तानी लष्करप्रमुख असीम मुनीर यांची डोनाल्ड ट्रम्प यांनी बरीच खातिरदारी सध्या चालवली आहे. पाकिस्तानला आर्थिक मदतही सुरू केली आहे. पहलगाम हल्ल्यातील दहशतवाद्यांना पाकिस्तानी लष्कराचीच शिकवणी होती असा आपला दावा आहे. त्यासाठी आपण जगभर शिष्टमंडळे पाठवली होती. पण त्याचा काडीचाही उपयोग झाला नाही. उलट अमेरिकेने आधी बंद केलेली पाकिस्तानची मदत पुन्हा सुरू करून भारतावरच निर्बंध लादले आहेत. या स्थितीत पाकिस्तानइतका नाही तरी थोडा सौम्य इशारा अमेरिकेलाही द्यायला हरकत नव्हती. पण ती हिंमत पंतप्रधानांना दाखवता आली नाही. अमेरिकेने भारतावर ५० टक्के आयातशुल्क लागू केले आहे. त्यामुळे आपले कपडे, चामड्याच्या वस्तू, जडजवाहिर, मासे इत्यादींच्या निर्यातीला मोठा फटका बसणार आहे. याबाबत सध्या वाटाघाटी चालू आहेत व स्वतः मोदी अमेरिकेला जाणार असल्याच्या बातम्या आहेत. त्यामुळे अमेरिकेबाबतचे आपले एकूण धोरण सुसरबाई तुझी पाठ मऊ अशा स्वरुपाचे आहे व मोदींच्या भाषणातही तेच दिसून आले. त्यांनी अमेरिकेवर काही बोलण्याऐवजी वस्तू अधिक स्वस्त कराव्यात व त्यांचा दर्जा वाढवावा असे आवाहनआपल्याच देशवासियांना केले. व्यापाऱ्यांनी स्वदेशीच वस्तू विकायला ठेवाव्यात असेही ते म्हणाले. या देशातला व्यापार मोदींचे राज्यबंधू असलेले गुजराती तसेच मारवाडी इत्यादींच्या हातात आहे. हेच लोक मोदींचे भक्त व भाजपचे कट्टर मतदार आहेत. स्वतःच्या फायद्यापुढे बाकी सगळ्या गोष्टी दुय्यम आहेत हाच या मंडळींचा बाणा असतो. मोदींच्या असल्या सल्ल्यांना त्यांनी पूर्वीही भीक घातलेली नाही. आता या मंडळींना स्वदेशीच वस्तू विकू अशी प्रतिज्ञा घेऊन ती पाळायला लावण्याचे काम भाजपच्या मंडळींनी करून दाखवावेच. तरच मोदींच्या भाषणाचा उपयोग झाला असे म्हणता येईल.

### संघाचा आक्षेपार्ह गौरव

नेहरु व इंदिरा गांधींच्या निर्णयावर टीका, काँग्रेसने देशाचे वाटोळे केले असा आरोप हे मोदींच्या भाषणात एरवीही असतेच. पण स्वातंत्र्यदिनाच्या भाषणातही हाच प्रचार चालू राहावा हे दुर्दैवाचे आहे. यंदा मोदींनी आणखी एक पाऊल पुढे टाकले. शंभर वर्षे पूर्ण करीत असलेल्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा त्यांनी भरभरून गौरव केला. संघाच्या कार्यकर्त्यांचे समर्पण, देशभक्ती इत्यादींविषयी भरपूर विशेषणे लावून ते बोलले. मोदी हे संघाच्या मुशीत वाढले असले तरी गेल्या दहा वर्षात त्यांनी असे उल्लेख टाळले होते. पण आता शंभरीच्या निमित्ताने त्यांनी लाल किल्ल्यावरून संघाला सरकारची सुप्रतिष्ठित मान्यता प्रदान केली. संघाचे व भाजपचे सध्या फाटलेले आहे. नड्डा यांच्या जागी नवीन अध्यक्ष कोण असावा याबाबत संघाने अडवून धरले आहे. मोदी १७ सप्टेंबरला ७५ वर्षांचे होत आहेत. त्यांनी निवृत्त व्हायला हवे असे मोहन भागवत यांनी उडत उडत सुचवून झाले आहे. त्या पार्श्वभूमीवर मोदींनी संघाचा असा जाहीर गौरव करणे उल्लेखनीय आहे. याबाबत मिडियात काहीही येत नसले तरी मोदींवर संघाचा जबरदस्त दबाव असल्याचे हे लक्षण आहे. आपण कोणाहीपुढे झुकत नाही असा मोदींचा एरवीचा पवित्रा असतो. पण संघाने त्यांना इथे झुकायला लावले आहे असे दिसते. मोदींचे स्वार्थी हेतू काहीही असोत. पण त्यांनी पंतप्रधान म्हणून असा गौरव करणे ही एका भयंकराची सुरुवात आहे. संघाचा स्वातंत्र्य चळवळीत काहीही सहभाग नव्हता. काँग्रेस, गांधी, नेहरु यांना कायम अपशकुन करणे व त्यांच्यावर टीका करणे हेच संघाचे धोरण होते. संघाची भाषा, शिकवण, बाबरी मशीद पाडण्यासारखा कार्यक्रम इत्यादींमुळे भारतीय समाजात हिंदू विरुद्ध मुस्लिम अशी दुही प्रचंड वाढली आहे. याचमुळे देशातील तरुण आज धर्मांधतेच्या वाटेवर भरकटला आहे. गोरक्षा, मांसाहाराला विरोध असल्या भलत्याच गोष्टींमध्ये आपल्या समाजाची उर्जा वाया चालली आहे. महात्मा गांधींची हत्या ते ७८ वर्षांचे असताना झाली होती. आज भारत ७८ वर्षे पूर्ण करत असताना संघाचा असा गौरव झाल्याने सुबुद्ध नागरिकांना हे श्रीराम म्हणण्याची वेळ आली आहे. बाकी मोदींच्या भाषणात विकसित भारत वगैरे मुद्दे तोंडी लावण्यासाठी होतेच. नवीन नोकरीला लागणाऱ्या तरुणांना १५००० रुपये देण्याची जुनीच योजना नव्याने जाहीर करण्यासारख्याच गोष्टी त्यात अधिक होत्या.

## विचार

# का वाढताहेत विद्यार्थ्यांच्या आत्महत्या?

***मुलांनी शिकून मोठे व्हावे, आपल्या पायावर उभे रहावे, आपण आयुष्यात खाल्लेल्या खस्ता मुलांच्या वाट्याला येऊ नयेत आणि मुलांनी आपल्या म्हातारपणाचा आधार व्हावे, असे प्रत्येक आईवडीलांना वाटते; परंतु या अपेक्षांच्या ओझ्याखाली आणि शैक्षणिक जगतातील वाढत्या स्पर्धेला तोंड देताना अनेक मुले आत्महत्यांचा मार्ग चोखाळत आहेत. सर्वोच्च न्यायालयाने त्यावर व्यक्त केलेली चिंता रास्त आहे.***



**नंदकुमार काळे**

विद्यार्थ्यांच्या आत्महत्यांच्या वाढत्या घटनांवर सर्वोच्च न्यायालयाने अलिकडेच चिंता व्यक्त केली आणि हे व्यवस्थेचे अपयश असल्याचे म्हटले. न्यायालयाने म्हटले की या घटनांकडे दुर्लक्ष करता येणार नाही. राष्ट्रीय गुन्हे नोंद ब्युरो (एनसीआरबी)च्या अहवालातील वाढती आकडेवारी चिंताजनक आहे. अहवालानुसार, २०२२ मध्ये देशभरात एकूण एक लाख ७० हजार ९२४ लोकांनी आत्महत्या केल्या, त्यापैकी १३ हजार ४४ विद्यार्थी होते. २००१ मध्ये पाच हजार ४२५ विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्या. 'एनसीआरबी'च्या अहवालानुसार अशा शंभर आत्महत्यांमध्ये आठ विद्यार्थ्यांचा समावेश होता. त्यापैकी २,२४८ विद्यार्थ्यांनी परीक्षेत नापास झाल्यामुळे जीवनत्याग केला. अभ्यासाचे ओझे, समाजाचे टोमणे, मानसिक ताण आणि शाळा-महाविद्यालयाची उदासीनता यासारख्या कारणांमुळे लहान मुले आपले जीवन संपवतात, तेव्हा हे स्पष्ट होते की आपली संपूर्ण व्यवस्था अपयशी ठरत आहे. 'एनईईटी'ची तयारी करणाऱ्या १७ वर्षांच्या विद्यार्थिनीच्या मृत्यूच्या प्रकरणाची सर्वोच्च न्यायालयाने चिकित्सा केली. ही विद्यार्थिनी विशाखापट्टणममध्ये शिकत होती. तिच्या मृत्यूची 'सीबीआय'कडून चौकशी करण्याची मागणी आंध्र प्रदेश उच्च न्यायालयाने फेटाळून लावली होती. त्याला सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले. सुनावणीदरम्यान न्यायालयाने संपूर्ण देशासाठी १५ महत्त्वाची मार्गदर्शक तत्त्वे जारी केली. विद्यार्थ्यांची मानसिक स्थिती सुधारणे आणि आत्म हत्येच्या घटना रोखणे हा त्यामागील उद्देश आहे. यासोबतच, न्यायालयाने केंद्राला ९० दिवसांच्या आत एक प्रतिज्ञापत्र सादर करण्यास सांगितले आहे. त्यात विद्यार्थ्यांच्या मानसिक समस्यांवर काम करणाऱ्या राष्ट्रीय कार्यदलाचा अहवाल आणि सूचना कधीपर्यंत पूर्ण होतील हे सांगण्यास बजावले आहे.

या वर्षी मार्चमध्ये सर्वोच्च न्यायालयाने मानसिक आरोग्य समस्या आणि विद्यार्थ्यांच्या आत्महत्येच्या घटना रोखण्यासाठी 'राष्ट्रीय कार्यदल' (एनटीएफ) तयार करण्याचे आदेश दिले होते. न्यायालयाने म्हटले होते की विद्यापीठांनी केवळ शिक्षण केंद्रे बनू नयेत, तर विद्यार्थ्यांच्या कल्याण आणि विकासासाठी जबाबदार असलेल्या संस्थांची भूमिकादेखील बजावावी. महाविद्यालयांमध्ये अजूनही जातीय भेदभाव आहे. त्यामुळे वंचित समुदायांच्या विद्यार्थ्यांमध्ये एकाकीपणाची भावना वाढत आहे. महाविद्यालयीन परिसरांमध्ये जातीवर आधारित भेदभाव हा संविधानाच्या कलम १५ चे स्पष्ट उल्लंघन आहे. विद्यार्थी आपल्या घरापासून दूर असलेल्या महाविद्यालयांमध्ये शिक्षण घेतात, तेव्हा विद्यापीठे आणि महाविद्यालयांना पालकांची भूमिका बजावण्याची आवश्यकता असते. महाविद्यालयांनी केवळ नियमांची अंमलबजावणी करणे अपेक्षित नाही, तर संकटकाळात विद्यार्थ्यांना भावनिक आधारही देणे आवश्यक आहे. भारतात आत्महत्या रोखण्यासाठी काही कायदे केले गेले आहेत. त्यानुसार मानसिक आरोग्यसेवा कायदा, २०१७ नुसार मानसिक विकारांनी ग्रस्त असलेल्या व्यक्तीला त्यावर उपचार घेण्याचा आणि सन्मानाने जगण्याचा पूर्ण अधिकार आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार सर्व शैक्षणिक संस्थांना रॅगिंगची तक्रार आल्यास पोलिसांकडे फिर्याद दाखल करावी लागेल.

२००९ मध्ये विद्यापीठ अनुदान आयोगाने म्हणजेच यूजीसीने उच्च शिक्षण संस्थांमध्ये रॅगिंगच्या घटना रोखण्यासाठी नियम जारी केले होते. विद्यार्थ्यांच्या चिंता, ताणतणाव, घराची आठवण, अपयशाची भीती यासारख्या समस्या सोडवण्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाने २०१६ मध्ये विद्यापीठांना विद्यार्थी समुपदेशन प्रणाली स्थापित करण्यास सांगितले होते. राष्ट्रीय शिक्षण धोरणानुसार शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या सामाजिक-भावनिक शिक्षणावर आणि शालेय प्रणालीमध्ये समुदायाच्या सहभागावर लक्ष केंद्रित केले पाहिजे. तसेच, शाळांमध्ये सामाजिक कार्यकर्ते आणि समुपदेशक असले पाहिजेत असे म्हटले आहे. कॉलेजजीवन हा एक महत्त्वाचा बदलाचा काळ आहे. बऱ्याच विद्यार्थ्यांना पहिल्यांदाच घरापासून दूर राहत असताना कुटुंब आणि मित्रांकडून कमी पाठिंबा मिळतो. वाढत्या स्वातंत्र्य आणि स्वायत्ततेसोबतच विद्यार्थ्यांना विविध ताणतणावांना तोंड द्यावे लागते. वाढत्या शैक्षणिक गरजा, नवीन वातावरणाशी जुळवून घेणे आणि नवीन आधार प्रणाली विकसित करणे आदी समस्यांना त्यांना तोंड द्यावे लागते. कॉलेजच्या काळात मद्य आणि व्यसनांचे मुलांना आकर्षण असते. बरेच विद्यार्थी मानसिक आरोग्य समस्या किंवा उपचारांचा पूर्वीचा इतिहास घेऊन महाविद्यालयात येतात. पर्यावरणीय ताणतणाव आणि मानसिक आरोग्य समस्या अनुभवण्याची प्रवृत्ती आत्महत्येचा धोका वाढवू शकते. अलिकडच्या राष्ट्रीय सर्वेक्षणात, १६ टक्के महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी नैराश्याच्या विकाराने ग्रस्त असल्याचे नोंदवले आहे.

आत्महत्या करणाऱ्या ९० टक्क्यांपेक्षा जास्त लोकांना निदान करण्यायोग्य मानसिक विकार असतो. महाविद्यालयीन वयातील तरुण-तरुणींपेक्षा चार ते सहापट जास्त आत्महत्या करतात. मुली पुरुषांपेक्षा प्राणघातक नसलेल्या मार्गांनी आत्महत्या करण्याचा प्रयत्न करण्याची शक्यता दोन ते तीनपट जास्त असते. आयुष्यात काही तरी बनण्याचे स्वप्न, अभ्यासाचे ओझे आणि इच्छेनुसार करिअर न केल्यास आत्महत्येकडे वळण्याचे प्रमाण जास्त असते. शैक्षणिक आशा आणि अनियंत्रित भावनिक आघातात अडकलेली पिढी आत्महत्येच्या मार्गावर जात असते. विद्यार्थ्यांच्या आत्महत्या दरवर्षी सुमारे चार टक्के दराने सातत्याने वाढल्या आहेत. २०२२ मध्ये सुमारे एक तृतीयांश विद्यार्थी आत्महत्या या तीन राज्यांमध्ये झाल्या होत्या. त्यात महाराष्ट्र (१,७६४ प्रकरणे), तामिळनाडू (१,४१६) आणि मध्य प्रदेश (१,३४०) अशी आकडेवारी समोर आली असून दक्षिणेकडील राज्यांमध्ये (आंध्र प्रदेश, कर्नाटक, केरळ, तामिळनाडू, तेलंगणा आणि केंद्रशासित प्रदेश) एकूण प्रकरणांपैकी २९ टक्के घडली. त्याच वेळी, मुलींच्या आत्महत्यांमध्ये सात टक्क्यांनी वाढ झाली. देशात २०२२ मध्ये आत्महत्या करणाऱ्यांमध्ये बरेच (५३ टक्के) विद्यार्थी होते; परंतु गेल्या काही वर्षांमध्ये आत्महत्या करणाऱ्यांमध्ये लिंगभेद दिसून येतो. परीक्षा-केंद्रित स्पर्धा आणि शैक्षणिक ताण हे महत्वाचे धोके बनू लागले आहेत.

'एनसीआरबी'च्या आकडेवारीनुसार, २०२२ मध्ये अल्पवयीन मुलांच्या १,१२३ आत्महत्या स्पष्टपणे परीक्षेतील अपयशाशी जोडल्या गेल्या होत्या. त्यात महाराष्ट्र अव्वल स्थानावर आहे (३७८ प्रकरणे). त्यानंतर मध्य प्रदेश आणि झारखंडचा क्रमांक लागतो. 'आयआयटी' आणि केंद्रीय विद्यापीठांसारख्या प्रतिष्ठित संस्थांमध्येही आत्महत्येच्या घटना वाढतच आहेत. २०१९ ते २०२३ दरम्यान एकट्या 'आयआयटी'मध्ये ९८ मृत्यूंची नोंद झाली. याच काळात केंद्रीय विद्यापीठांमध्ये रॅगिंगमुळे १२२ मृत्यू झाले. या संकटाच्या पार्श्वभूमीवर, सर्वोच्च न्यायालयाने माजी न्यायाधीश एस. रवींद्र भट यांच्या नेतृत्वाखाली एक राष्ट्रीय कार्यदल स्थापन करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्याचे रक्षण करण्यासाठी सुधारणांची शिफारस ते करते. राष्ट्रीय आत्महत्या प्रतिबंधक धोरणात २०३० पर्यंत आत्महत्या मृत्युदर दहा टक्क्यांनी कमी करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. शैक्षणिक लक्ष स्पर्धेपासून विद्यार्थ्यांच्या कल्याणाकडे वळले पाहिजे. संस्थांना अभ्यासक्रमात एकत्रित केलेल्या मजबूत करिअर आणि समुपदेशन प्रणालींची आवश्यकता आहे. विद्यार्थी आत्महत्येची आकडेवारी विचारात घेतल्यास यात महाराष्ट्र अव्वल असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे पुरोगामी महाराष्ट्रासाठी हा कलंक असून, निकोप शिक्षणपद्धती विकसित करण्याकामी आपण कमी पडल्याचे दिसून येत आहे.

आजकाल सर्वच पालक आपला पाल्य आघाडीवर रहावा, यासाठी सातत्याने दडपण टाकताना दिसून येत आहे. त्यामुळे विद्यार्थी आपल्या पालकांच्या आशा-अपेक्षा पूर्ण करण्यात कमी पडल्यानंतर खोट्या प्रतिष्ठेपायी आत्महत्येकडे वळताना दिसून येत आहेत. राष्ट्रीय गुन्हे नोंदणी विभागाच्या अहवालातील आकडेवारीनुसार विद्यार्थ्यांच्या आत्महत्यांमध्ये वाढ झाल्यावरून चिंता व्यक्त करण्यात आली आहे.

या आत्महत्या शेतकरी आत्महत्येच्या संख्येपेक्षा अधिक असल्याचे समोर आले आहे. त्यामुळे देशभरात विद्यार्थ्यांवर असलेले दडपण यातून स्पष्ट दिसून येते. त्यामुळे आपल्याला शिक्षणपद्धती बदलण्याची खरी गरज आहे. हसत खेळत आणि साध्या-सोप्या भाषेत विद्यार्थ्यांना समजेल अशा भाषेत शिक्षण देणे गरजेचे आहे; मात्र त्याकडे दुर्लक्ष होत असल्याचे दिसून येत आहे.

## चर्चा आजची

# खड्डेमुक्तीची फक्त आश्वासनेच



**प्रमोद जाधव**

रायगड जिल्ह्यातील मुंबई गोवा महामार्गासह जिल्हा, अंतर्गत रस्त्यांची वाताहात जगजाहीर आहे. या खड्डेमय रस्त्यांबाबत सोशल मिडीयासह वेगवेगळ्या माध्यमातून नाराजी व्यक्त केली जाते. सण, उत्सव जवळ आल्यावर खड्डे मुक्त करण्याचे आश्वासन प्रशासन, शासन कायमच देत आहे. परंतु प्रत्यक्षात त्याची अंमलबजावणी प्रशासनाकडून होत असताना दिसत नाही. त्यामुळे खड्डे मुक्तीची फक्त आश्वासनेच, असे चित्र आजही आहे.

मुंबई-गोवा महामार्गातील अरुंद रस्त्यामुळे पूर्वी प्रचंड अपघात होत असत. हे अपघात रोखण्यासाठी वेगवेगळ्या संस्था, संघटनांनी पुढाकार घेत चार पदरी रस्ता करण्याची मागणी केली. अनेक वेळा आंदोलनेदेखील झाली. अखेर मागणीची दखल घेण्यात आली. त्यानंतर चार पदरी रस्त्याला मंजूरी मिळाली.२००८ पासून मुंबई गोवा महामार्गाचे चार पदरी रस्त्याचे काम सुरु झाले. सुरुवातीला डांबरीकरण, रुंदीकरण्यावर भर देण्यात आले. परंतु डांबरी रस्ते पावसात खराब होऊ लागले. त्यामुळे पुन्हा या डांबरी रस्त्यांवर सिमेंट काँक्रीटीकरणचा लेप देऊन रस्ते मजबूत करण्याचा प्रयत्न करण्यात आला. पळस्पे ते इंदापूर या ८४.६० किलो मीटरपर्यंत या रस्त्याचे आतापर्यंत ९६ टक्के काम पूर्ण झाल्याची माहिती संबंधित विभागाकडून देण्यात आली आहे. नागोठणे ते कोलेटी या पाच किलो मीटरच्या अंतरावर ठिकठिकाणी खड्ड्यांचे साम्राज्य निर्माण झाले आहे. दरवर्षी डिसेंबर, मे महिन्याचे आश्वासन देत रस्ते तयार केले जातील अशी ग्वाही प्रशासन, व शासन देत आले आहे. गणेशोत्सवाच्या कालावधीत आजही खड्ड्यातूनच प्रवास करण्याची वेळ चाकरमान्यांसह पर्यटक व प्रवाशांवर येत आहे. परंतु खड्डेमुक्तीचा प्रश्न काही सुटलेलाच नाही. अलिबाग - रोहा मार्गावरील १७१ कोटी रुपयांचा रस्ता गेल्या चार वर्षापासून प्रलंबित आहे. रुंदीकरण, डांबरीकरण, मजबूतीकरण तसेच काँक्रीटीकरण करून रस्ता तयार केला जाणार आहे. परंतु आजही वेलवली खानाव ते उसर, वावे, सुडकोली ते नांगरवाडी मार्गावर ठिकठिकाणी खड्ड्यांचे साम्राज्य आहे. वेलवली खानाव ते गेल कंपनीपर्यंत करण्यात आलेले काँक्रीटीकरण अपुर्ण स्थितीत असल्याचा फटका प्रवाशांना बसत आहे. खड्डे चुकविताना चालकांना प्रचंड त्रास होत आहे. कंबरदुखीचे आजार निर्माण होऊ लागेल आहे. खड्डेमय रस्त्यामुळे अपघात होण्याची भिती निर्माण झाली आहे.

कनकेश्वर फाटा ते सागाव पर्यंतच्या रस्त्याची अवस्थादेखील बिकट झाली आहे. केलेले काँक्रीटीकरण अपूर्ण स्थितीत आहे. जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागाच्या अखत्यारित पाच हजार किलोमीटरचे अंतर्गत रस्ते आहेत. यातील ५० किलो मीटरपेक्षा अधिकचे अंतर्गत रस्ते आजही खराब आहेत. निधी नसल्याने या रस्त्यांची दुरुस्ती होण्यास अडथळे निर्माण झाले आहेत. त्यामुळे गावांतील विकासाला या खड्ड्यांमुळे खिळ बसली आहे.

खड्डे बूजविण्याचे काम सार्वजनिक बांधकाम व जिल्हा परिषद बांधकाम विभागाने सुरु केले आहे. परंतु खड्डे बुजविताना दगड, मातीचा भराव टाकला जात आहे. मोठ मोठे दगडामुळे अपघात होण्याची भिती असताना बाप्पाची मुर्ती आणतानादेखील त्रास होण्याची शक्यता नाकारता येणार नाही. जिल्ह्यात गणरायाचे आगमन येत्या २७ ऑगस्टपासून घरोघरी होणार आहे. परंतु यंदाही गणरायाचे आगमन खड्ड्यातून होणार असल्याचे चित्र आहे. गेल्या काही वर्षापासून खड्ड्यातूनच गणरायाचे आगमन होत आहे. खड्डेमुक्तीचे आश्वासन फक्त त्या दिवसापुरताच असतात. अन्य दिवशी ये रं माझ्या मागल्या अशी परिस्थिती आहे. गणरायाचे आगमन होण्यासाठी अकरा दिवस शिल्लक राहिले आहेत. त्यामुळे या दहा दिवसांच्या आत तरी खड्डे चांगल्या पध्दतीने बुजवून प्रवास सुकर करण्यासाठी संबंधित विभागाने प्रयत्न करावा. मुंबई, पुणे, बोरीवली येथून येणाऱ्या चाकरमान्यांना प्रवास करताना आनंद निर्माण व्हावा, हीच अपेक्षा जिल्ह्यातील जनतेची आहे. प्रशासन याबाबत गांभीर्याने लक्ष देईल अशी अपेक्षा आहे.

## लोकसंसद

### दहीकाल्याची बोधप्रद संकल्पना!



श्रीकृष्णाने व्रजमंडळात गायी चारतांना स्वतःची आणि सवंगड्यांच्या शिदोऱ्या एकत्र करून खाद्यपदार्थांचा काला केला आणि सर्वांसह ग्रहण केला. या कथेला अनुसरून पुढे श्रीकृष्ण जयंतीच्या दुसऱ्या दिवशी म्हणजे गोकुळाष्टमीच्या दुसऱ्या दिवशी काला करण्याची आणि दहीहंडी फोडण्याची प्रथा पडली. कालपरत्वे या प्रथेचे व्यावसायिकरण झाले आणि ठिकठिकाणी लाखांची बक्षिसे मिळवून देणाऱ्या हंड्या बांधल्या जाऊ लागल्या. पुढे हंड्या राहिल्या बाजूला आणि केवळ मनोऱ्यांचीच स्पर्धा सुरु झाली. जेव्हढे थर जास्त तेव्हढी थर लावणाऱ्या गोविंदा पथकांना मिळणारी रक्कम जास्त. हळूहळू त्यामध्येही चढाओढ होऊ लागली आणि या धार्मिक उत्सवाचे पुरते बाजारीकरण झाले. श्रीकृष्णाने आपल्या सवंगड्यासह आपलीही शिदोरी एकत्र करून सारे भेद नष्ट करून एकत्र येण्याचा मोलाचा संदेश दिला आहे. आज हिंदू धर्मामध्ये जातीपातीच्या नावाखाली, राजकीय पक्षभेदामुळे आणि वैचारिक फरकांमुळे विविध गट निर्माण झाले आहेत. आज जाहिराती, सिनेमा, वेब सीरिजच्या माध्यमांतून केले जाणारे देव-देवतांचे, महापुरुषांचे, इतिहासाचे विकृतीकरण याचे आपल्याला काहीच वाटत नाही. कोणीही उठते आणि हिंदूंच्या धार्मिक प्रथा परंपरांना अंधश्रद्धा म्हणून हिणवते. पाश्चिमात्य संस्कृतीच्या प्रभावामुळे आपणच आपल्या महान संस्कृतीला विसरून परकीय संस्कृतीला जवळ करू लागलो आहोत. परिणामी आपलीच अपरिमित हानी होत आहे. भगवान श्रीकृष्णाच्या शिकवणीनुसार यंदा आपापसातील सारे मतभेद विसरून राष्ट्राच्या आणि धर्माच्या पुनरुत्थानासाठी एकत्र येण्याचा संकल्प करूया आणि खऱ्या अर्थाने गोपाळकाला साजरा करूया !

**– सौ, मोक्षदा घाणेकर, मुंबई**

## दिनविशेष

# सामाजिक ऐक्य, सहकार्यचे प्रतीक- दहीहंडी

सामाजिक ऐक्य, सहकार्यचे प्रतीक- दहीहंडी सण हिंदू पंचांगानुसार, भाद्रपद महिन्यातील कृष्ण पक्षातील अष्टमी तिथीला श्रीकृष्णाचा जन्म झाला. त्यामुळे दरवर्षी या दिवशी भक्तगण श्रीकृष्ण जन्मोत्सव मोठ्या थाटामाटात साजरा करतात. दुसऱ्याच दिवशी म्हणजे नवमीला हा सण विशेषतः महाराष्ट्रातील मुंबई, पुणे, ठाणे आणि गुजरातमधील अनेक शहरांमध्ये मोठ्या थाटामाटात साजरा केला जातो. तर उत्तर प्रदेशातील मथुरा, वृंदावन आणि गोकुळमध्येही हा उत्सव साजरा होतो. दहीहंडी हा केवळ एक खेळ किंवा परंपरा नसून हा उत्सव सामाजिक ऐक्य, सहकार्यचे प्रतीक मानला जातो.

हा सण श्रीकृष्णाच्या बालपणीच्या नटखट लीलांची आठवण म्हणून साजरा केला जातो. श्रीमद्भागवत गीतेतील वर्णनानुसार, बाळकृष्णाला लोणी, दही, दूध यांची विलक्षण आवड होती. गोपिकांनी लोणी लपवून ठेवले तरीही कान्हा आपल्या मित्रांच्या मदतीने मानवी पिरॅमिड रचून उंचावर ठेवलेली हंडी फोडायचा. या गोड, खोडकर प्रसंगाचे स्मरण म्हणून दहीहंडीची परंपरा रूढ झाली. द्वापार युगापासून सुरू झालेला हा उत्सव आजपर्यंत तितक्याच उत्साहाने साजरा केला जातो.

दहीहंडी म्हणजे तरुणाईच्या जिव्हाळ्याचा विषय. दहीहंडीच्या दिवशी मातीच्या मडक्यात दही, लोणी, मिठाई, फळे भरून ती उंच ठिकाणी टांगली जाते. गोविंदा आला रे आला असं म्हणत उंचच उंच बांधलेल्या दहीहंडी फोडायला गोविंदा पथक जोशात मनोरे रचताना या दिवशी पहायला मिळते. गाणी, नाच, उंच चढणाऱ्या गोविंदांच्या अंगावर पाणी फेकून त्यांना खाली पाडण्याचा प्रयत्न असा एकच दंगा यावेळी चाललेला असतो. या मडक्याचा तुकडा मिळाला तर घरी आणून सांभाळून ठेवला जा-तो. त्याने घरात समृद्धी येते अशी भावना आहे.

हा उत्सव महाराष्ट्रात अतिशय मोठ्या प्रमाणावर आणि जल्लोषात साजरा केला जातो. आजकाल तर दहीहंडी फोडण्याची स्पर्धा केली जाते. हंडी फोडणाऱ्या पथकांना रोख रक्कम, भेटवस्तू आणि सन्मानपत्र देऊन गौरवले जाते. त्यामुळे या सणाला चार चांद तर लागतातच शिवाय या सणाची उत्सुकता देखील वाढते. अशा पथकांना गोविंदा पथक असे म्हणतात. महिलांचे संघही अशा सपर्धांमध्ये सहभाग घेतात. अगदी लहान मुलांपासून ते मोठ्यांपर्यंत सर्वजण दहीहंडीची वाट पाहतात. गल्लीगल्लीत देखील हा सण लहान मुले आनंदात साजरा करतात. गोविंदा बनून हंडी फोडण्याची मुले मजा लुटतात. महाराष्ट्रातील दहीहंडी उत्सवाला आता एक विशेष ओळख मिळाली आहे, ज्यामुळे हा सण देशभरात लोकप्रिय झाला आहे. दहीहंडी हा फक्त खेळ किंवा परंपरा नाही, तर तो एकता, टीमवर्क, धाडस आणि श्रीकृष्णाच्या आनंदी, बंधुत्वाच्या संदेशाचा उत्सव आहे. त्यामुळे प्रत्येक वर्षी जन्माष्टमीच्या दुसऱ्या दिवशी उंचावर टांगलेली हंडी आणि तिला फोडण्यासाठी झगडणारा गोविंदा हा महाराष्ट्राच्या संस्कृतीचा अविभाज्य भाग ठरतो.

## कविता

### दहीहंडी

विशेष सण दहीहंडीचा
गोविंदाच्या उत्साहाचा
अनेक महिन्यांच्या सरावाचा
कष्ट आणि परिश्रमाचा
नटखट गोविंदा पथके येता मैदानी
जल्लोषाने दुमदुमली अलिबागनगरी
तुडुंब गर्दी जमली मनोरे पाहणाऱ्यांची
थरावर थर रचती, थरार उंच उंच भारी
खेळ हा कौशल्य, जिद्द, शौर्याचा
परिश्रम आणि धाडसी मनोधैर्याचा
बालगोपालांच्या निडर सहासाचा
एकजुटीचा आणि बंधुभावाचा
अलिबाग जपतो परंपरा छान
गोविंदा राखतो सामाजिक भान
उंच थराने दहीहंडी फोडणाऱ्यांचा मान
विजयी पथकाचा होतो भव्य सन्मान

*– राजाराम भगत, मोठे शहापूर*

# माणगावात १८ ऑगस्टला चक्काजाम!

## • बायपास आणि महामार्गासाठी माणगावकर नागरिकांच्या संयमाचा फुटला बांध!

**। माणगाव । वार्ताहर ।**

**माणगांव शहरातील वाढत्या वाहतूक कोंडीमुळे नागरिकांच्या संतापाचा पारा चढला असून, बायपासच्या कामातील दिरंगाईवर आणि महामार्गाचे अपूर्ण काम या जिव्हाळ्याच्या प्रश्नावर अखेर जनआंदोलनाची ठिणगी पडली आहे.**

शहरात दिवसरात्र निर्माण होणारी वाहतूक कोंडी, गोंधळ, हॉर्नांचा कर्णकर्कश आवाज आणि वाहनांच्या धुरामुळे माणगांवकरांचे जगणे अक्षरशः त्रासदायक झाले आहे. रस्त्यावरून चालणे, श्वास घेणे सुद्धा कठीण होऊन बसले आहे. या प्रमुख मागणीसाठी माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. राजीव साबळे यांनी जिल्हाधिकारी यांना निवेदन देऊन मुंबई – गोवा महामार्गावर माणगाव येथे १८ ऑगस्टला रोजी सोमवारी चक्काजाम आंदोलन करण्याचा इशारा दिला असून माणगावकरांच्या सहनशीलतेचा अंत झाला असून संयमाचा बांध फुटला आहे. त्यामुळे या आंदोलनाकडे आता सर्वांचेच लक्ष लागून राहिले आहे.

नागरिकांच्या म्हणण्यानुसार, लोणेरे येथील उड्डाणपुलाचे काम पूर्ण झाल्यानंतरच माणगांव बायपासचे काम सुरू करण्याचे नियोजन होते. पूर्वी चेतक कंपनीकडे देण्यात आलेले हे काम ॲम्को व निखील कन्स्ट्रक्शन या उपकंत्राटदारांमार्फत सुरू होते. पावसाळ्यापूर्वी काम पूर्ण करण्याचे आदेश असूनही अर्धा पावसाळा उलटून गेला तरीही काम अपूर्णच आहे. शिवाय, या कामाची मूळ निविदा रद्द करण्याची प्रक्रिया सुरू असल्याचे समजते. नवीन निविदा तब्बल २६५ कोटी ५८ लाखांची असून, ती २५% कमी दराने फेब्रुवारी महिन्यात मंजूर झाल्याची माहितीही समोर आली आहे. या पार्श्वभूमीवर स्थानिकांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे तात्काळ कारवाईची मागणी केली आहे. या मागणीसाठी रस्ते व वाहतूक केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, रायगड खा. सुनील तटकरे, मंत्री महिला व बालविकास विभाग अदिती तटकरे, मंत्री सार्वजनिक बांधकाम विभाग शिवेंद्रराजे भोसले, रायगड पोलीस अधीक्षक, माणगाव उपविभाग माणगाव उपविभागीय अधिकारी, माणगाव तहसीलदार, माणगाव पोलीस निरीक्षक, महाड सार्वजनिक बांधकाम विभाग यांना निवेदन देऊन लक्ष वेधले आहे. प्रमुख मागण्यांमध्ये नव्या कंत्राटदारांना त्वरित कार्यादेश देणे, अर्धवट असलेल्या पुलांचे काम युद्धपातळीवर पूर्ण करणे, बायपासलगतच्या उतेखोल, नाणोरे, भादाव आदी गावांना जोडणारे रस्ते अंदाजपत्रकात समाविष्ट करणे यांचा समावेश आहे.

नागरिकांनी इशारा दिला आहे की, मागण्यांकडे दुर्लक्ष झाल्यास तीव्र जनआंदोलन उभारले जाईल. माणगांव शहर आणि परिसरातील जनतेसाठी बायपास हा केवळ विकासाचा नाही तर दैनंदिन जगण्याचा प्रश्न आहे. त्यामुळे प्रशासनाने वेळीच पावले उचलून काम पूर्णत्वास नेणे, ही काळाची गरज असल्याचे नागरिकांचे मत आहे. अन्यथा रस्त्यावरील आंदोलनातूनच सरकारला जागे करण्याचा निर्धार माणगांवकरांनी व्यक्त केला आहे.

# कुष्ठरोग निवारण समिती शांतीवनच्या विरोधात एक दिवसीय उपोषण

**। पनवेल । वार्ताहर ।**

कुष्ठरोग निवारण समिती शांतीवनच्या विरोधात आजीव सभासदांनी १५ ऑगस्ट रोजी एक दिवसीय लाक्षणिक उपोषण सुरू केले आहे.

कुष्ठरोग निवारण समिती, शांतीवन या संस्थेमध्ये अनधिकृत बांधकामे करून भ्रष्टाचाराला बळ दिले जात असल्याचा आरोप केला जात आहे. पैशांचा अपहार केल्याबाबत पोलीस ठाण्यात तक्रार दाखल आहे आणि न्यायालयीन खटला देखील सुरू आहे. अशी व्यक्ती संस्थेची पदाधिकारी असल्याचे राजेंद्र शिंदे यांनी सांगितले.

याबाबत सहाय्यक धर्मादाय आयुक्त व संस्थाचालक यांना पत्र देऊन तक्रार देखील करण्यात आली आहे. मात्र याबाबत अद्याप कोणतेही उत्तर मिळालेले नसल्याचे शिंदे यांचे म्हणणे आहे. त्यामुळे १५ ऑगस्ट २०२५ रोजी लोकशाही मार्गाने आजीव सभासद राजेंद्र शिंदे तसेच शांतीवनप्रेमी यांनी एक दिवसीय लाक्षणिक उपोषणाला सुरुवात केली आहे. भ्रष्टाचाऱ्यांवर कारवाई न झाल्यास यापुढे पुढची भूमिका घेऊ असे यावेळी सांगण्यात आले.

कुष्ठरोग निवारण समिती शांतीवनची १२२ एकर जागा आहे. शांतीवनच्या इतिहासात पहिल्यांदाच लाक्षणिक उपोषण सुरू करण्यात आले आहे. निसर्गोपचार विभागात अनधिकृत बांधकाम करून बेकायदेशीर रित्या सभासद नोंदणी झालेली असल्याचा आरोप करण्यात येत आहे.

नवीन सभासद एकाच कुटुंबातील आहेत. भोजनालयाच्या दुरुस्तीबाबत कामापेक्षा जास्त पैसे कंत्राटदाराला देण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे.

**अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे**

**१६ ऑगस्ट**

१) श्री. मनोहर हरी पवार
अलिबाग, १६-८-१९३९
२) श्री.प्रदीप नीलकंठ फाटक
विद्यानगर, अलिबाग, १६-८-१९४९
३) श्रीम.नीलिमा नरेंद्र दळवी
ब्राम्हणआळी, अलिबाग, १६-८-१९५२
४) श्री. दत्तात्रेय महादेव नागावकर
रामनाथ, अलिबाग, १६-८-१९५१

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)**
**९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

## बोध

हरिणाला पकडण्यासाठी पारधी ज्याप्रमाणे सर्व बाजूंनी हरिणाला अडवित अडवित जिथे त्याला नेमके पकडता येईल अशा ठिकाणी आणतो आणि त्याचा घात करतो त्याचप्रमाणे विषयभोगभिलाष जीवाला अडवित, भुलवित काम क्रोधाच्या तावडीत आणून सोडतो.यामुळे विषयभोगाचे सुख तर बाजूलाच राहते, पण आपण काम क्रोध आणि त्याचे मत्सर, द्वेष इत्यादी तमो गुणी साथीदार यांच्या तावडीत सापडतो.एकदा जीव विवेक भ्रष्ट झाला की मग तो किती घसरेल हे सांगता येत नाही. या घसरगुंडीतून तो जीव जेव्हा सावरेल तेव्हाच सावरेल

**श्रीज्ञानेश्वर भावहृदय**
**आबामहाराज परांजपे**
**साधना आश्रम,**
**दातार आळी, पेण**

# रसायनीतील रस्त्याचे काम तहसीलदारांच्या मध्यस्थीने मार्गी

**। रसायनी । वार्ताहर ।**



खालापूर तालुक्यातील रीस रसायनी येथील रस्ता खालापूर तहसीलदार अभय चव्हाण यांच्या मध्यस्थीने पुन्हा बनविण्यात आल्याने रहिवाशी यांनी तहसीलदार अभय चव्हाण यांचे आभार व्यक्त केले आहेत.

दांडफाटा ते आपटा या रस्त्यावर रीस गावच्या हद्दीत रस्त्यालगत असणाऱ्या स.नं.३७/१ ब निशिगंधा रहिवाशी सोसायटी व खाजगी मालक यांची स.३७/२ व ३७/३ ही जमीन असून दोघांच्या मधील रस्त्यावरून वाद निर्माण झाला होता, या रस्ता बाबत तहसीलदार खालापूर यांच्याकडे तक्रार दाखल करण्यात आली होती. खाजगी मालक असलेले भाकरे डेव्हलपर्स यांनी ही जागा विकसित करण्यासाठी रस्ता सुरू केला होता, त्यास निशिगंधा सोसायटी यांनी हरकत घेतली होती.मंडळ अधिकारी श्रीनिवास खेडकर यांनी प्रत्यक्ष जागेची पाहणी केली, तसा अहवाल तहसीलदार खालापूर यांना सादर केला.स.न.३७/२ व स.न.३७/३ ही जागा मोकळी असल्याने लोकांची ये जा सुरू होती.मामलेदार ॲक्ट नुसार खालापूर तहसीलदार अभय चव्हाण यांनी प्रत्यक्ष जागेवर जाऊन पाहणी केली. दोघांशी चर्चा केली. दोघांनी आपापली जागा मोजून घेण्याचे ठरविले, तोपर्यंत खणलेला रस्ता पुन्हा करण्याबाबत मागणी करण्यात आली असता, तहसीलदार अभय चव्हाण यांच्या मध्यस्थीने रस्ता करण्याचे भाकरे डेव्हलपर्स यांनी मान्य करून कच्चा रस्ता ऐवजी सिमेंटचा रस्ता तयार करून दिला.

त्यामुळे निशिगंधा सोसायटी येथील रहिवाशी आणि परिसरातील ये जा करणाऱ्या ग्रामस्थानी तहसीलदार अभय चव्हाण यांचे आभार व्यक्त करून भाकरे डेव्हलपर्स यांनीही समंजस भूमिका घेतल्याने आनंद व्यक्त केला. वादविवाद होण्यापूर्वी मंडळ अधिकारी श्रीनिवास खेडकर यांनी घेतलेली भूमिका महत्वाची ठरली. रस्ता सुरू झाल्याने आनंद व्यक्त करण्यात आला.

# शालेय वस्तूचे वाटप करून जपली सामाजिक बांधिलकी

**। खोपोली । प्रतिनिधी ।**

जेएसडब्ल्यू या कंपनीमार्फत कंपनी परिसरातील सांगडे गावामधील रायगड जिल्हा परिषद शाळेच्या पहिली ते पाचवीच्या विद्यार्थ्यांना कंपनीकडून शैक्षणिक साहित्यांबरोबरच क्रीडा खेळाच्या वस्तूंचे वाटप ८ ऑगस्ट रोजी करण्यात आले.

क्रीडा खेळाच्या वस्तूंचे वाटप करीत सामाजिक बांधिलकी जपली असून जेएसडब्ल्यूचे संस्थापक ओ.पी.जिंदल बाबूजी यांच्या ९५ व्या जयंतीनिमित्त या कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

या उपक्रमासाठी कंपनीचे एचआर अनिल महाजन यांनी नेतृत्वाखाली घेत गोरगरीब गरजू विद्यार्थ्यांना एक हात मदतीचा देऊन या शाळेतील ६० विद्यार्थ्यांना छत्री, वह्या पुस्तके, स्कुल बॅग, क्रिकेट खेळाचे साहित्य तसेच कॅरम बोर्ड व इतर साहित्य तसेच खाऊ वाटप केल्याने विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर वेगळाच आनंद पाहायला मिळाला.

तसेच शाळेचे मुख्याध्यापक किरण धारणे यांच्या विशेष प्रयत्नातुन कंपनीकडे पाठपुरावा केल्यामुळे मुलांना शैक्षणिक मदत मिळालेली असून यावेळी जेएसडब्ल्यू कंपनीचे अनिल महाजन, वर्षा महाकाल, चंदा तुपे, सुनील मिश्रा, पंकज गुप्ता आदी प्रमुखांसह मोठ्या विद्यार्थी व शिक्षक वर्ग उपस्थित होता.

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकार श्री.दशरथ तुकाराम साबळे आणि ब्रिजबिहारी माथुर यांनी मौजे. धामोते, ता, कर्जत, जि.रायगड येथील मिळकतीचे मालक वेदांती सचिन जाधव यांचेकडून सदर खालीलप्रमाणे वर्णन केलेली बिनशेती मिळकत विकत घेणेचे ठरविलेले आहे.

| सर्व्हे नं. | प्लॉट नं. | क्षेत्र चौ. मी. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|
| ११२ | १० | ४१५-०० | ४१-५० |

सबब सदरबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची सदरची नोटीस प्रसिद्ध झाले पासून २१ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतेही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकती ह्या निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून वरील मिळकतींचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहुन येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक : १४/०८/२०२५

**ॲड. शिवाजी किसन टोकरे**
पत्ता - शॉप नं.९, समर्थ कृपा हौसिंग सोसायटी नेरळ, महेश टॉकीज जवळ, नेरळ ता.कर्जत, जि.रायगड
पिनकोड नं. ४१०१०१
फोन नं. ७३५०१९४२००

### रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.
### अलिबाग-रायगड
### सभेची नोटीस
### (बँकेच्या व्यक्तिगत भागधारकांसाठी)

रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. अलिबागच्या व्यक्तिगत भागधारकांची सभा शनिवार दिनांक ३०.०८.२०२५ रोजी सकाळी ठिक ९.३० वाजता बँकेचे केंद्र कार्यालय अलिबाग येथील सभागृहात बोलाविण्यात येत आहे. तरी सर्व व्यक्तिगत भागधारकांनी सदर सभेस हजर रहावे ही विनंती.

**- : सभेपुढील विषय :-**

विषय क्र. १ :- बँकेच्या पोटनियम क्रमांक २४ व महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा १९६० व नियम १९६१ नुसार वार्षिक सर्वसाधारण सभेत मतदान करणेसाठी प्रतिनिधींची निवड करणे.

संचालक मंडळाच्या आदेशानुसार
सही/-

अलिबाग
दिनांक १६/०८/२०२५

**मंदार मनोहर वर्तक**
मुख्य कार्यकारी अधिकारी

**रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. अलिबाग**
**६४ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस**
**(फक्त सभासदांसाठी)**

रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. अलिबाग या बँकेची ६४ वी वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवार दिनांक ३०.०८.२०२५ रोजी सकाळी ठिक १०.०० वाजता रायगड जिल्हा मध्यवर्ती सह. बँकेचे केंद्र कार्यालय अलिबाग येथील तिसऱ्या मजल्यावरील सभागृहात बँकेचे चेअरमन मा.श्री. जयंत प्रभाकर पाटील यांचे अध्यक्षतेखाली भरणार आहे. सभेत खालीलप्रमाणे कामकाज केले जाईल.

तरी सर्व सभासदांनी सभेस वेळेवर उपस्थित रहावे ही विनंती.

**सभेपुढील विषय**

१) मागील दिनांक २४.०८.२०२४ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून मंजूर करणे.
२) मागील दिनांक ०२.०४.२०२५ रोजी झालेल्या विशेष सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून मंजूर करणे.
३) सभा संचालक मंडळाने तयार केलेला सन २०२४-२०२५ सालचा वार्षिक अहवाल, ताळेबंद व नफा तोटा पत्रकास मंजूरी देणे.
४) सन्मा. संचालक मंडळाने सूचविलेल्या सन २०२४-२०२५ सालच्या नफा वाटणीस मंजूरी देणे.
५) सन २०२४-२०२५ सालचे अंदाजपत्रकानुसार प्रत्यक्षात झालेल्या खर्चास व उत्पन्नास तसेच सन २०२५-२०२६ या सालाकरीता सन्मा. संचालक मंडळाने सूचविलेल्या अंदाजपत्रकास मंजूरी देणे.
६) बँकेच्या सन २०२४-२०२५ सालच्या वैधानिक लेखापरीक्षण अहवालाची नोंद घेणे.
७) बँकेच्या सन २०२५-२०२६ या वर्षाचे लेखापरीक्षण करणेसाठी सहकार खाते/नाबार्डचे मंजूर पॅनलवरील लेखापरीक्षकाची नियुक्ती करणेबाबत निर्णय घेणे.
८) सामोपचार कर्ज परतफेड योजनेस सन २०२५-२०२६ या वर्षासाठी मुदतवाढ देणेबाबत विचार करणे.
९) सामोपचार परतफेड कर्ज योजनेअंतर्गत कर्ज पूर्ण फेड झालेल्या तसेच मा. संचालक मंडळाने मंजूर केलेल्या प्रकरणांना अंतिम मान्यता देणेबाबत विचार करणे.
१०) वैयक्तिक कर्जदार सभासद/संस्थांकडील कर्जखात्यांचे कर्जवसूलीचे हक्क अबाधित ठेवून निर्लेखन केलेल्या कर्ज प्रकरणांना अंतिम मान्यता देणेबाबत विचार करणे.

मा. अध्यक्ष साहेब यांचे परवानगीने आयत्यावेळी येणाऱ्या विषयांचा विचार करणे.

संचालक मंडळाच्या आदेशानुसार
सही/-

अलिबाग
दिनांक : १६/०८/२०२५

**मंदार मनोहर वर्तक**
मुख्य कार्यकारी अधिकारी

**विशेष सूचना :-**

१) वरील सभा गणपूर्ती अभावी तहकूब करावी लागल्यास सदर सभा त्याच दिवशी अर्ध्या तासाच्या अवधीनंतर त्याच ठिकाणी सभेच्या कामकाजास सुरूवात केली जाईल. त्यावेळी गणपूर्तीची आवश्यकता राहणार नाही.
२) सभेच्या वेळी सभासदांना विषयपत्रिकेवरील विषयासंबंधी काही माहिती हवी असेल किंवा सभेपुढे काही सूचना मांडावयाच्या असतील तर त्या लेखी स्वरूपात दिनांक २५/०८/२०२५ पर्यंत बँकेच्या केंद्र कार्यालयास मिळतील अशा बेताने पाठवाव्यात.
३) संस्थेमार्फत पाठवावयाचा प्रतिनिधी, सदर संस्थेचा थकबाकीदार नाही अशा आशयाचा दाखला प्रतिनिधीत्वाचे ठरावासोबत आणला पाहिजे. (पोटनियम क्र. २५ (इ) सदर ठरावाचा व प्रमाणपत्राचा नमुना नोटीसीसोबत दिला आहे.)
४) व्यक्तिगत सभासद सभेस हजर राहू शकतील. मात्र त्यांना पोटनियम क्रमांक २४ प्रमाणे अधिकार राहतील.

**(ठरावाचा व प्रमाणपत्राचा नमुना)**

.......... सोसायटी लि. ची पंचकमिटी दिनांक ............. २०२५ रोजी झाली. त्या सभेतील ठराव नंबर .................. ची खरी नक्कल.

ठराव नंबर :-
रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या दिनांक ३०.०८.२०२५ रोजी होणाऱ्या वार्षिक सर्वसाधारण सभेत या संस्थेतर्फे भाग घेण्याचा व मतदान करण्याचा अधिकार श्री. ....................................... यांना देण्यात येत आहे.

सूचकाचे नाव :-
अनुमोदकाचे नाव :-

तारीख : सेक्रेटरी चेअरमन
ठिकाण : .................. सोसायटी लिमिटेड
सील :

**-: प्रमाणपत्र :-**

मा. चेअरमन साहेब
रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. अलिबाग-रायगड यांसी
........................................................ सोसायटी लि.
यांजकडून प्रमाणपत्र देण्यात येते की, श्री.............................................. या संस्थेचे सभासद असून ते कसलेही प्रकारचे थकबाकीदार नाहीत.

तारीख : सही/-
ठिकाण : चेअरमन
सील : ................. सोसायटी लिमिटेड

# कोर्लई किल्ला येथे स्वातंत्र्यदिन उत्साहात

**। रेवदंडा । वार्ताहर ।**

मुरूड तालुक्यातील कोर्लई किल्ला येथे स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा करण्यात आला.



भारतीय स्वातंत्र्यदिनाचे औचित्याने कोर्लई किल्ला येथे ध्वजवंदन कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी येथे रेवदंडा पोलिस ठाण्याचे पोलीस उपनिरिक्षक म्हशीलकर, पोहवा पारवे, पोना गव्हाणे, पोशि शिरशिवकर यांची प्रमुख उपस्थिती होती तसेच कोर्लई किल्ल्यावरील कर्मचारी सुहास पवार, जोगेंद्र टिवळेकर,योगेश रोटकर, विघ्नेश रोटकर, परेश नाटुस्कर, संतोष पवार, व प्रफुल्ल मेघे तसेच सुरक्षा रक्षक सुनिल पाटील आदींची उपस्थिती होती.

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**

### जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे आशिलांनी खालील वर्णन केलेल्या मिळकती विकत घेण्याची ठरविलेली आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे:-

**मिळकतीचे वर्णन**

| अ.क्र | मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग क्र. | क्षेत्र (हे.आर.पॉ) | आकार (रू. पै.) |
|---|---|---|---|---|
| १ | हाशिवरे ता. अलिबाग, जि. रायगड | ८८/४ | क्षेत्र ०.१५.९०<br>पो.ख. ०.००.००<br>एकूण क्षेत्र ०.१५.९० | १.०६ |
| २ | हाशिवरे ता. अलिबाग, जि. रायगड | ९२/१ | क्षेत्र ०.३४.१०<br>पो.ख. ०.०१.८०<br>एकुण क्षेत्र ०.३५.९० | ४.०० |
| ३ | हाशिवरे ता. अलिबाग, जि. रायगड | १०४/१ | क्षेत्र ०.५१.८०<br>पो.ख. ०.०१.००<br>एकुण क्षेत्र ०.५२.८० | ४.७५ |
| ४ | हाशिवरे ता. अलिबाग, जि. रायगड | १३७/३ | क्षेत्र ०.५६.५०<br>पो.ख. ०.०२.००<br>एकुण क्षेत्र ०.५८.५० | ६.२५ |
| ५ | हाशिवरे ता. अलिबाग, जि. रायगड | १४५/२ | क्षेत्र ०.५८.४०<br>पो.ख. ०.०४.८०<br>एकुण क्षेत्र ०.६३.२० | ५.७५ |
| ६ | हाशिवरे ता. अलिबाग, जि. रायगड | १९८/४ | क्षेत्र ०.४३.१०<br>पो.ख. ०.०३.८०<br>एकूण क्षेत्र ०.४६.९० | ३.७५ |

वर वर्णन केलेल्या मिळकतीमध्ये अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध ताबाकब्जा, भाडेपट्टा, इजमेंट, साठेकरार, खरेदीखत, गहाण, दान, बोजा व अन्य कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी ह्या नोटीसीच्या तारखेपासून ०७ दिवसाच्या आत प्रथमदर्शनी पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती दाखल कराव्यात. याप्रमाणे सदर मिळकतीबाबत कोणतेही प्रकारची हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहीत आहे. असे गृहित धरून माझे अशिल वरील मिळकतीच्या संदर्भात नियोजित खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व विहीत मुदतीच्या नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकतीस माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

अलिबाग
दिनांक : १५/०८/२०२५

**ॲड. अमर अशोक घरत**
मु.पो. थळ, पेठ नाका,
ता. अलिबाग, जि. रायगड

### जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे आशिलांनी खालील वर्णन केलेल्या मिळकती विकत घेण्याची ठरविलेली आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे:-

**मिळकतीचे वर्णन**

| अ. क्र | मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग क्र. | क्षेत्र (हे.आर.पॉ) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|---|
| १ | बहिरीचापाडा ता.अलिबाग, जि.रायगड | ५०/३ | क्षेत्र ०.६२.५०<br>पो.ख.०.०३.३०<br>एकूण क्षेत्र ०.६५.८० | ७.७५ |
| २ | बहिरीचापाडा ता.अलिबाग, जि.रायगड | ७३/४ | क्षेत्र ०.१३.४०<br>पो.ख.०.००.५०<br>एकुण क्षेत्र ०.१३.९० | १.१९ |
| ३ | बहिरीचापाडा ता.अलिबाग, जि.रायगड | ८४/६ | क्षेत्र ०.२६.६०<br>पो.ख.०.००.२०<br>एकुण क्षेत्र ०.२६.८० | २.९४ |

वर वर्णन केलेल्या मिळकतीमध्ये अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध ताबाकब्जा भाडेपट्टा, इजमेंट, साठेकरार, खरेदीखत, गहाण, दान, बोजा व अन्य दस्त कोणत्याही प्रकारचा हित संबंध असल्यास त्यांनी ह्या नोटीसीच्या तारखेपासून ०७ दिवसाच्या आत प्रथमदर्शनी पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती दाखल कराव्यात याप्रमाणे सदर मिळकतीबाबत कोणतेही प्रकारची हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहीत आहे असे गृहित धरून माझे आशिल वरील मिळकतीच्या संदर्भात नियोजित खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व विहीत मुदतीच्या नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकतीस माझे आशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची कृपया संबधीतांनी नोंद घ्यावी.

अलिबाग.
दिनांक : १५/०८/२०२५

**ॲड. अमर अशोक घरत**
मु.पो.थळ, पेठ नाका,
ता.अलिबाग, जि.रायगड

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील परिशिष्टात वर्णन केलेली जमीन मिळकत जमीन मालक मंजू कांतीलाल जैन व इतर यांचे कडून विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे-वावंढळ, ता.खालापुर, जि.रायगड**

| सर्व्हे नं./हिस्सा नं. | क्षेत्रफळ (हे.आर.पॉ.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|
| ७९/१ | ५.२५.३०<br>पो.ख ०.०५.००<br>एकूण ५.३०.३० | ६.३३ |

**शेतघर क्षेत्र २५.०० चौ.मी. म्हणजेच, ग्रुप ग्रामपंचायत, वावंढळ, ता.खालापुर, जि.रायगड यांचे हद्दीतील घर नं.२६९, क्षेत्र १३.३८ चौ.मी. कारपेट.**

तरी वरील मिळकतीमध्ये इतर कोणत्याही प्रकारे हक्क हितसंबंध असल्यास व सदर व्यवहार होण्यास कोणाचीही हरकत असल्यास, सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत पुराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत नोंदवावी. सदर नोटीशीच्या मुदतीत हरकत न आल्यास, सदर मिळकती निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून, आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

दिनांक : १५/०८/२०२५

सही /-
**ॲड. प्रणीत भिंगारदिवे अॅन्ड असोसिएटस्**
मो.९५९४९३०८८९
ऑफीस : ऑफीस नं.०५, पहिला मजला,
नेमिनाथ शॉपींग सेंटर, मुद्रे (बु.), कचेरी रोड,
कर्जत, ता.कर्जत, जि.रायगड - ४१०२०१.


# ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**


### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे की, आमचे अशिल अझर मुर्तुझा गांगू, रा.खोपोली पेण रोड, डोणवत, ता.खालापूर, जि.रायगड यांनी खालील वर्णन केलेली बिनशेती जमिन मिळकत तिचे विद्यमान मालकांकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तरी नमुद मिळकतीचे वर्णन पुढील प्रमाणे:-

**मौजे-कशेळे, तालुका-कर्जत, जि.-रायगड येथील बिनशेती जमिन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र आर.चौ.मी. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|---|
| उर्मिला विजय जाधव | ५३ | २/१ | २९७.०० | २९.७० |

सदरची बिनशेती जमीन मिळकत ही वरील मालकांची निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीची असून त्या विकत देण्याचा त्यांना हक्क अधिकार असल्याने त्यांनी सदरील मिळकत या तद्‌गभुत हक्क हितसंबंधासह आमचे अशिलांना विकत देण्याचे ठरविले आहे. तरी वर वर्णन केलेल्या मिळकती संदर्भात इतर कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, मृत्युपत्रांकीत दान, कुळवहिवाट, बोजा, चार्ज, लिन वगैरे कोणतेही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून ०७ दिवसांचे आत खाली सही करणार खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी हरकती नोंदवाव्यात. मात्र दिलेल्या मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील व मुदती नंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर कोणतेही प्रकारे बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

ठिकाण : कर्जत
दि. १६/०८/२०२५

खरेदीदारा तर्फे वकील
**ॲड. लक्ष्मण धर्मराज जाधव**
पत्ता.मार्वल क्षिप्रा रेसीडेन्सी, शॉप नं.२४,
डी विंग, मुद्रे बुद्रक, ता.कर्जत, जि.रायगड
मो. ८१४९२११३६६/७७०९१६०५६७

# जिल्ह्यात स्वातंत्र्यदिन उत्साहात



| अलिबाग | प्रतिनिधी |

**रायगड जिल्हयामध्ये भारताचा ७९ वा स्वातंत्र्य दिन साजरा करण्यात आला आहे. शाळा, महाविद्यालये, सरकारी कार्यालय अशा अनेक ठिकाणी ध्वजारोहणाचा कार्यक्रम झाला. या निमित्ताने देशभक्तीपर गीतांसह सांस्कृतिक कार्यक्रम, स्वच्छता मोहिम, व्यसन मुक्तीची प्रतिज्ञा असे अनेक उपक्रम राबवून जनजागृती करण्यात आली. भर पावसात भिजत हा उत्सव साजरा करण्यात आला.**

## निवडक



### किहीम ग्रामपंचायत कार्यालयात ध्वजारोहण

**सोगाव** : अलिबाग तालुक्यातील किहीम ग्रामपंचायत कार्यालयात भारताच्या ७९ व्या स्वातंत्र्यदिन शुक्रवार (दि. १५) ऑगस्ट रोजी सरपंच प्रसाद उर्फ पिंट्या गायकवाड यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी स. म. वडके शाळेच्या विद्यार्थ्यांनी राष्ट्रगीत व देशभक्तीपर गीते सादर केली. त्यानंतर उपस्थित सर्वांना खाऊचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमास मिलिंद पडवळ, इतर ग्रामपंचायत सदस्य, सदस्या, ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कर्मचारीवर्ग, पोलीस पाटील, अंगणवाडी सेविका, आशा सेविका तसेच पंचक्रोशीतील आदी मान्यवर व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### खांबमध्ये ज्ञान विज्ञान प्रतिकलाकृती

**कोलाड** : ज्ञानांकुर इंग्लिश मिडीयम स्कूलमध्ये ७९ वा स्वातंत्रदिन उत्साहात साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांनी विविध ज्ञान विज्ञान प्रतिकलाकृती साकारून रंगी बेरंगी फुलांची सजावटीत उजळून निघाली होती. ज्ञानेश्वर लोखंडे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी रविंद्र लोखंडे, नारायण लोखंडे, डॉ. श्याम भाऊ लोखंडे, दिलीप मोहिते, तुकाराम कोंडे, संतोष महाडिक, गणेश कोस्तेकर, प्रदीप मरवडे, सचिन गोळे, विक्रांत गुरव, सूर्यकांत पोटफोडे,अमित भोईर, प्रवीण पोटफोडे, हरिश्चंद्र लोखंडे, महेंद्र वाघमारे, आरती तुपकर, प्रकाश कोकाटे, अर्चना परबळकर, माधवी चितळकर, रिया लोखंडे, सोनाली शिंदे, रुपाली मरवडे , प्रियांका चिकने, प्रतीक्षा धामणसे, सायली म्हात्रे, जान्हवी महाडिक, दर्शना धनवी, ज्ञानेश्वर महाडिक, निलेश टवळे, श्रुती वाजे उपस्थित होते.

### पोलिसांकडून राष्ट्रध्वजास सलामी



**उरण** : भारताचा ७९ वा स्वातंत्र्यदिन उरण शहरासह ग्रामीण भागात ठिकठिकाणी उत्साहात पार पडला. या निमित्ताने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.स्वातंत्र्य दिनानिमित्त उरणचे तहसीलदार डॉ. उध्दव कदम यांच्या हस्ते शासकीय प्रांगणात ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी पोलीस पथकाने राष्ट्रध्वजास राष्ट्रीय सलामी दिली. ध्वजारोहण कार्यक्रमास अनेक मान्यवर उपस्थित होते. उरण नगर परिषद, पंचायत समिती कार्यालय, कनिष्ठ न्यायालय, उरण, मोरा सागरी, न्हावा शेवा पोलीस ठाणे, सार्वजनिक बांधकाम विभाग उरण तसेच इतर शासकीय कार्यालयाच्या प्रांगणात उपस्थित मान्यवरांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी वरिष्ठ पोलीस निरीक्षक जितेंद्र मिसाळ, मुख्याधिकारी समीर जाधव, नरेश पवार, न्यायालयाचे न्यायाधीश, वकील व शासकीय वकील अधिकारी-कर्मचारी, सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते. तसेच ग्रामीण भागातील ग्रामपंचायत कार्यालयाच्या प्रांगणात,शाळा, विद्यालयाच्या प्रांगणात,तलाठी कार्यालयाच्या प्रांगणात सरपंच, उपसरपंच ग्रामपंचायत सदस्य, स्थानिक नागरिक, तसेच विविध पक्षांचे पदाधिकारी कार्यकर्ते यांच्या उपस्थितीत ध्वजारोहण करण्यात आले.

### श्रावणीच्या हस्ते ध्वजारोहण

**तळा** : तळा तालुक्यात भारताचा ७९ वा स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी नगरपंचायत, तहसील यांसह सर्वच शासकीय कार्यालयांमध्ये त्या-त्या प्रमुख अधिकाऱ्यांच्या हस्ते ध्वजारोहण करत असताना तळा शहरातील रायगड जिल्हा परिषदेच्या तळे मराठी शाळेत श्रावणी प्रल्हाद दळवी या विद्यार्थिनीच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आला. श्रावणीने नवोदय परीक्षेत प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाल्यामुळे तिच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी शाळेच्या मुख्याध्यापिका सुप्रिया जामकर, भास्कर गोळे, वेदिका गोरीवले, सुनिल बैकर, मित्तल वावेकर यांसह सर्व शिक्षक वर्ग, पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.




## क्लासिफाईड

*जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी*

- **अलिबागमध्ये ऑफिस** कामासाठी मुलगा पाहिजे. संपर्क : ९९२३२३५०५६/८१४९६७३०१८
- **अलिबाग मधील रेस्टॉरंटसाठी** वेटर, कुक, इ. पाहिजे आहेत. तसेच किचन मॅनेजरची आवश्यकता आहे. इच्छुकांनी खालील फोन क्रमांकावर संपर्क साधावा. मोबाईल क्रमांक -७७६७८५३९९९

**जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१**


## पेझारी प्राथमिक शाळेत स्वातंत्र्यदिन




| पेझारी | प्रतिनिधी |

अलिबाग तालुक्यातील आंबेपूर पेझारी येथील प्राथमिक शाळेत मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. शाळा समितीचे अध्यक्ष डॉ. शैलेंद्र म्हात्रे यांचे हस्ते ध्वजारोहण करण्यात आला. यावेळी पंचायत समितीचे माजी गट शिक्षणाधिकारी नितेश पाटील, अमरनाथ पाटील, गजानन पाटील, दिगंबर म्हात्रे, परशुराम म्हात्रे, प्रकाश म्हात्रे, विजय पाटील, उदय धुमाळ, सचिन धुमाळ, अमित पाटील, विनोद पाटील, राजन पांचाळ, स्वप्नील धुमाळ, शिरीष पाटील, जनार्दन पाटील, दत्तात्रय पाटील, नीलिमा पाटील, नामदेव पाटील, राकेश म्हात्रे, सत्यवान पाटील, पालक, ग्रामस्थ, विद्यार्थी शिक्षक वृंद उपस्थित होते. अंबरनाथ पाटील यांनी इयत्ता पहिली ते आठवी व ज्युनिअर सीनियर वर्गामध्ये पहिले तीन क्रमांक येणाऱ्या विद्यार्थ्यांना ११ हजार रुपयाची बक्षीस मान्यवरांच्या हस्ते देण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आशिया काजळे व लीना तोडणकर यांनी केले. आभार अजय ठाकूर यांनी मानले.

## सोगाव शाळेतर्फे गावात प्रभातफेरी

| सोगाव | प्रतिनिधी |

अलिबाग तालुक्यातील सोगाव येथील राजिप उर्दु, उर्दू हायस्कूल व राजिप मराठी शाळेत स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा करण्यात आला.

प्रभातफेरीमध्ये तिन्ही शाळेतील विद्यार्थी, शिक्षक, मुख्याध्यापक, मुख्याध्यापिका सहभागी झाले होते. त्यानंतर प्रत्येक शाळेतील पटांगणावर ध्वजारोहण केले. या कार्यक्रमास सचिन घाडी, ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच, स्थानिक माजी ग्रामपंचायत सदस्य, सदस्या, सामाजिक कार्यकर्ते, पोलीस पाटील, अंगणवाडी



सेविका, मदतनीस, शिक्षकवर्ग, मुख्याध्यापक, मुख्याध्यापिका, सोगाव पंचक्रोशीतील मान्यवर व ग्रामस्थ तसेच तिन्ही शाळेतील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## स्वातंत्र्यदिनी व्यसन मुक्तीची प्रतिज्ञा

**रोहा** : स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून रोहा अंजुमन हायस्कूलच्या पटांगणात अतिक बडे यांच्या हस्ते ध्वजारोहण पार पडले. याप्रसंगी तबस्सूम दापोलकर यांनी रोहे-अष्टमीकर बांधव, भगिनी तसेच विद्यार्थी व विद्यार्थिनींना व्यसनमुक्ती प्रतिज्ञा दिली. याप्रसंगी कादीर रोगे, समोर शेडगे, अहमद दर्जी, महेश कोलटकर, रियाज शेटे, सलीम चौगले, सरफराज बंदरकर, डॉ. फरिद चिमावकर, उस्मान रोहेकर, शिंदे, भगवान पेणकर, मुजीब अलेकर, मुबीन करजिकर, फारूक सवाल, जमीर करजिकर, नागरिक मोठया संख्येने उपस्थित होते.



● १०० दिवसांची कार्यालयीन सुधारणा विशेष मोहिमेतंर्गत तालुकास्तरावर केलेल्या उत्कृष्ट कार्याबद्दल राखी मंगेश गावडे यांना स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे यांच्या हस्ते गौरविण्यात आले.

## नांदगाव विद्यालयात विद्यार्थ्यांचा गुणगौरव

| पाली/गोमाशी | प्रतिनिधी |

संत नामदेव माध्यमिक विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय नांदगाव येथे ७९ वा स्वातंत्र्य दिनानिमित्त संस्थेचे अध्यक्ष सुरेश खैरे यांच्या प्रमुख उपस्थितीत विद्यालयातील विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा आयोजित करण्यात आले होता.

भोराई शिक्षण संस्थेचे अध्यक्ष सुरेश खैरे यांच्या हस्ते नांदगाव विद्यालयात ध्वजारोहण करण्यात आले.त्यानंतर विद्यार्थ्यांनी राज्यगीत तसेच कवायत प्रकार करण्यात आले. स्व. नामदेवशेठ खैरे सभागृहात इयत्ता ५ वी ते १२ वी तील गुणवंत विद्यार्थ्यांचा




गुणगौरव करण्यात आला होता. यावेळी सुधागड तालुक्यात इयत्ता १२ वी मध्ये कला शाखेत प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झालेली ज्योत्स्ना पुजारे हिचा विशेष गौरव करण्यात आला.

याप्रसंगी सुरेश खैरे, रुपाली भणगे, रमेश खैरे, जगदीश सुतार, ढोपे संभाजी, बबन पालवे, शांताराम लहाने, दत्ताराम शिंदे पंचक्रोशीतील नागरिक, माजी विद्यार्थी, एसटी चालक वाहक, शिक्षक वृंद आणि शिक्षकेत्तर कर्मचारी वर्ग उपस्थित होते.

## रानवलीत ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**श्रीवर्धन** : स्वातंत्र्याचा ७८ वा वर्धापन दिन राजिप शाळा रानवली मराठी येथे साजरा करण्यात आला. यावेळी राष्ट्रगीत, राज्यगीत व ध्वजगीत गायन करण्यात आले. यावेळी मोठ्या संख्येने ग्रामस्थ व पालक उपस्थित होते. त्याचप्रमाणे तलाव परिसर, पशुवैद्यकीय दवाखाना, उर्दू शाळा रानवली, उंड्रे हायस्कूल, अंजुमन हायस्कूल, पोस्ट कार्यालय या ठिकाणी ध्वजारोहण झाले. यावेळी सुरेश मांडवकर, अत्ताउल्ला जालगावकर, राजू जाधव तसेच समाज अध्यक्ष, ग्रामस्थ व महिला मंडळ, शिक्षकवृंद उपस्थित होते.



## विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप

| श्रीवर्धन | प्रतिनिधी |

बोर्ली पंचतन येथील सन्मित्र सेवा संस्थेच्या वतीने अ. स. ई. अंतुले माध्यमिक शाळा दिघी येथील आदिवासी आणि गरजू होतकरू विद्यार्थ्यांना शालेय शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.

उपक्रमासाठी हर्षद जैन, किरीट संघवी, क्षितिज संघवी, सूर्यकांत चव्हाण, अभिषेक यादव, सुजित खनलोसकर ,वसीम फकजी, विराज तोडणकर, अंकुर माने आदी मान्यवरांचे सहकार्य लाभले. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन मुंडे यांनी केले. सदर कार्यक्रमास अनंत मेंदाडकर, नितीन सुर्वे, समीर दिवेकर, गणेश वेळासकर, ॲड. शैलेश चांदोरकर, मनीष अमृसकर उपस्थित होते.



● चौलमळा येथील प्राथमिक शाळेत गावचे प्रमुख रवींद्र घरत यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी शाळेच्या मुख्याध्यापिका रंजना नाखरे, माजी मुख्याध्यापिका विनिता थळकर यांच्यासह गावचे प्रतिष्ठित नागरिक विद्यार्थी उपस्थित होते.

## श्रमिक विद्यालयात विविध कार्यक्रम

**खांब** : रोहा तालुक्यातील नवजीवन शिक्षण प्रसारक मंडळ खांब संचलित श्रमिक विद्यालय चिल्हे येथे स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा करण्यात आला.(दि.१३) ऑगस्ट रोजी सुभाष माटल यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले तर (दि.१४) ऑगस्ट रोजी धोंडू कचरे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी धोंडू कचरे, धनाजी लोखंडे, निलेश मरवडे, दिपक जगताप यांच्यासह सर्व शिक्षक तथा शिक्षकेतर कर्मचारी वर्ग उपस्थितीत होते. या कार्यक्रमात समुहगान, देशभक्तीपर नृत्ये, शालेय स्वच्छता, व्यसनमुक्ती, पसायदानचे सामुदायिक पठण, स्वच्छता जनजागृती आदी कार्यक्रम करण्यात आले.

## म्हसळ्यात गायनाची स्पर्धा

| म्हसळा | प्रतिनिधी |

भारतीय स्वातंत्र्याचा ७९ वा स्वातंत्र्यदिन संपूर्ण तालुक्यात उत्साहात साजरा केला. मुख्य शासकीय ध्वजारोहण तहसीलदार सचिन खाडे यांच्या हस्ते कन्याशाळेच्या भव्य प्रांगणात संपन्न झाले. पंचायत समिती म्हसळा येथील ध्वजारोहण गटविकास अधिकारी माधव जाधव, संजय कर्णिक, फझल हलदे, नाजीम हसवारे, नसिर मिठागरे याच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

या निमित्ताने म्हसळा शहरातील विद्यार्थ्यांच्या कलागुणांचे सादरीकरण करून त्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी नृत्य सादरीकरण व



गायनाची स्पर्धा घेण्यात आले. नृत्य सादरीकरणमध्ये प्रथम क्रमांक व्हिजन स्कूलने पटकाविला तर द्वितीय क्रमांक न्यू इंग्लिश स्कूलने पटकाविला. तर गीत गायनामध्ये प्रथम क्रमांक नाईक अंतुले महाविद्यालय यांनी पटकाविला तर द्वितीय क्रमांक आय.डी. एल हायस्कूल यांनी पटकाविला.

याप्रसंगी महसूल नायब तहसीलदार डॉ. मृणाली शिरसाट, पोलीस निरीक्षक संदीप कहाळे, मंडळ अधिकारी सलीम शहा, संध्या अंबुर्ले, शशिकांत शिर्के, संजय खांबेटे, महादेव पाटील, हिरामण चव्हाण, संजय दिवेकर,बाबू पाटील, अजय करंबे आदी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## नागोठण्यात विविध कार्यक्रम



| नागोठणे | प्रतिनिधी |

देशाचा ७९ वा स्वातंत्र्य दिन नागोठणे ग्रामपंचायत कार्यालयासमोर तसेच सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालयांत, शाळा, महाविद्यालयांत उत्साहात साजरा करण्यात आला. सुप्रिया महाडिक यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

याप्रसंगी किशोर जैन, डॉ. मिलिंद धात्रक, अखलाक पानसरे, ज्ञानेश्वर साळुंखे, प्रकाश कांबळे, सचिन ठोंबरे, संतोष नागोठणेकर, शबाना मुल्ला, सुप्रिया काकडे, अमृता महाडिक, पूनम काळे, विनिता पाटील, भाविका गिजे, ज्योती राऊत, शहनाज अधिकारी, जन्नत कुरेशी, सुलताना लंबाते, विलास चौलकर, निलोफर पानसरे, राकेश टेमघरे, बाळासाहेब टके, सिराज पानसरे, अशपाक पानसरे यांच्यासह अनेक मान्यवर, नागरिक तसेच विविध शाळांतील विद्यार्थी यावेळी उपस्थित होते.

याशिवाय येथील कोएसोच्या बापूसाहेब देशपांडे संकुलात स्थानिक शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष नरेंद्र जैन यांच्या हस्ते तर वेलशेत येथे भाएसो शैक्षणिक संकुलात किशोर जैन यांच्या हस्ते तर होली एंजल स्कूलमध्ये विजय मुल्कवाड यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. तसेच नागोठण्यातील अष्टविनायक पतसंथेमध्ये अध्यक्ष विलास चौलकर यांचे हस्ते, नागोठणे विभाग सहकारी भातगिरणी संस्थेत सदानंद गायकर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. याशिवाय नागोठणे शहर व विभागातील सर्व ग्रामपंचायत कार्यालये, माध्यमिक विद्यालये, सहकारी संस्था, वन कार्यालय, प्राथमिक आरोग्य केंद्र, सहकारी पतसंस्था, पोलीस ठाणे तसेच सर्व शाळांमध्ये स्वातंत्र्य दिनानिमित्त ध्वजारोहण करण्यात आले.




## नेरळ व्यापारी फेडरेशनकडून रक्तदान

| नेरळ | प्रतिनिधी |

नेरळ येथील व्यापारी सेवाभावी संस्था फेडरेशन यांच्या माध्यमातून दिनाचे औचित्य साधून रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते.या शिबिरात ५१ रक्तदात्यांनी रक्तदान केले. रक्तदान शिबिराचे आयोजन नेरळ बाजारपेठमधील आरसीका शॉपिंग सेंटर येथे रक्तदान शिबीर आयोजित केले होते. नेरळ व्यापारी फेडरेशनचे अध्यक्ष मनोहर अहिरे, प्रीतम गोरी, अरविंद कटारिया, विशाल साळुंके, दिनेश जैन, अमित जैन, सलीम तांबोळी, कमलेश ठक्कर, महेश कटारिया, निलेश शहा, जैद नजे, अमरीश शहा आदी व्यापाऱ्यांनी रक्तदान शिबीर यशस्वी व्हावे यासाठी प्रयत्न केले.

## कोप्रोलीत सौर कंदीलांचे वाटप

| उरण | प्रतिनिधी |

देशाच्या ७९ वा स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून कोप्रोली ग्रामपंचायतीच्या माध्यमातून मागासवर्गीय आदिवासीवाडीतील कुटुंबांना सौर कंदीलचे वाटप करण्यात आले. तसेच दिव्यांग लाभार्थी सन २०२५/२६ पाच टक्के निधी लाभार्थ्यांना वाटप उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. तसेच रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कोप्रोली येथील पहिली ते सातवीमधील प्रथम, व्दितीय, तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण झालेल्या मुलांचा गुणगौरव तसेच शिष्यवृत्तीचे वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमांसाठी रणजीत म्हात्रे, गिरीश म्हात्रे, विपुल म्हात्रे, नीरज म्हात्रे, शेखर ठाकूर, विश्वनाथ पाटील, विवेकानंद म्हात्रे, विकी म्हात्रे उपस्थित होते सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ग्रामपंचायतीचे प्रशासक अधिकारी विनोद मिंडे, योगिता म्हात्रे, शुभा म्हात्रे, सुचिता पाटील, मनोहर कातकरी यांनी सहकार्य केले. कार्यक्रमाचे नियोजन प्रवीण खैरे यांनी केले.






# ही तो नित्याची बाब





'बिग बॉस १४' मध्ये अनेक लोकांची मने जिंकणाऱ्या जास्मिनने नुकतेच काही धक्कादायक खुलासे केले आहेत. आपल्या खाजगी आणि व्यावसायिक आयुष्याबद्दल अगदी उघडपणे सांगत 'कास्टिंग काउच'च्या अनुभवाचा भयानक अनुभव तिने शेअर केला आहे. यात एका दिग्दर्शकाने तिच्याशी गैरवर्तन करण्याचा प्रयत्न केल्याचे तिने स्पष्ट केले आहे.

तिने सांगितले की, एका दिग्दर्शकाने तिला ऑडिशनसाठी हॉटेलच्या खोलीत बोलावले. त्यानुसार ती गेली. पण तिने प्रथम तिथे एका माणसाला दारू पिताना पाहिले. दुसरा माणूस तेथे होता. पण नंतर तो निघून गेला. तेव्हा मात्र मी चांगलीच घाबरले. त्यानंतर त्या व्यक्तीने, तुम्हाला एक सीन करायचा आहे... असे म्हटले आणि तिच्या आणखी जवळ आला.

पण 'सर, ठीक आहे, मी सीन तयार करून उद्या परत येईन... 'असे म्हणत तिने तेथून सुटण्याचा प्रयत्न केला. पण तो म्हणाला, 'नाही... तुला हे आताच करावे लागेल.' एवढे सांगितल्यानंतर ही अभिनेत्री पुढे सांगते, दिग्दर्शकाने मला सांगितले की, सीनमध्ये तुझा प्रियकर निघून जात आहे आणि ती त्याला थांबवत आहेस... तेव्हा मी त्याने सांगितल्याप्रमाणे सीन केला. पण तो म्हणाला; नाही, असे नाही.... असे म्हणत उठून त्याने गेट बंद केले आणि माझ्याशी चुकीचे वागण्याचा करण्याचा प्रयत्न करू लागला. पण योग्य वेळी मी कौशल्याचा वापर केला आणि तेथून पळून गेले. जास्मिन पुढे म्हणाली, '...आणि त्या दिवशीच ठरवले की यापुढे हॉटेलच्या खोलीत कोणत्याही बैठकीला जायचे नाही. आयुष्यात कधीच नाही... इंडस्ट्रीमध्ये कास्टिंग काउचबद्दल बोलताना जास्मिन म्हणाली, 'ही गोष्ट नक्कीच अस्तित्वात आहे. हे काही निरुपयोगी लोक तुमचा फक्त फायदा घेतात. तेव्हा मी सर्वांना सांगू इच्छिते की, योग्य कास्टिंग कॉल समजून घेणे खूप महत्त्वाचे आहे. कधीही हताश होऊन कुठेही जाण्यास तयार होऊ नका. योग्य पद्धतीने कास्टिंग करायचे असणारे कधीही कोणाला कास्टिंग काउच करणार नाहीत'.

# 'बागी ४' मध्ये बघण्याजोगे काय?



अखेर टायगर श्रॉफच्या बहुप्रतिक्षित 'बागी ४' या ॲक्शन थ्रिलर चित्रपटाची पहिली झलक टीझरच्या स्वरूपात समोर आली आणि त्याचे भयावह पोस्टर्स पाहिल्यानंतर 'बागी ४' सीरिजमधील मागील चित्रपटांपेक्षा तो अधिक भयानक असेल हे निश्चित झाले कारण हा टीझर रक्तपाताने भरलेला असून टायगर श्रॉफ कधीही न पाहिलेल्या अवतारात त्यात दिसत आहे.

'बागी ४' बद्दल अनेकांना उत्सुकता होती. टीझरने चाहत्यांची ही उत्सुकता आणखी वाढवली आहे. टीझरमध्ये बागी उर्फ टायगर श्रॉफ अधिक रक्तरंजित, प्राणघातक आणि हिंसक दिसत असून तो संजय दत्तशी सामना करत आहे. अर्थातच संजय दत्त चित्रपटात एक भयावह खलनायकाची भूमिका साकारत आहे.

१.४९ सेकंदाच्या या टीझरमध्ये टायगर श्रॉफ, संजय दत्त, सोनम बाजवा आणि हरनाज संधू एक तगडी लढाई लढताना दिसत आहेत. टीझरची सुरुवात टायगर श्रॉफच्या आवाजाने होते. पार्श्वभूमीत तो सांगतो की, त्याचे प्रेम एकतर संकटात आहे किंवा मृत आहे आणि तो त्याच्या हरवलेल्या प्रेमाचा बदला घेण्यासाठी कोणत्याही थराला जाऊ शकतो.

टीझर रिलीज करताना टायगरने लिहिले, 'स्वतःला तयार ठेवा. एक रक्तरंजित, हिंसक प्रेम कथा सुरू होते आहे.' तर मंडळी, ए. हर्ष दिग्दर्शित आणि साजिद नाडियाडवाला निर्मित, 'बागी ४' मध्ये अनेक रक्तपाती ॲक्शन दृश्ये पाहायला मिळतील हे नक्की. हा चित्रपट पाच सप्टेंबर २०२५ रोजी प्रदर्शित होणार आहे. हा 'बागी' फ्रँचायझीमधील चौथा चित्रपट आहे. 'बागी' २०१६ मध्ये प्रदर्शित झाला, त्यानंतर २०१८ मध्ये दुसरा भाग आणि २०२० मध्ये तिसरा भाग समोर आला. तिन्ही हिट झाले आणि आता टायगर श्रॉफ चौथ्या चित्रपटात सर्वात धोकादायक अवतारात दिसणार आहे. तेव्हा पाहण्यास तयार राहायलाच हवे.

# आता शोध नवीन नायिकेचा

सुपरस्टार दीपिका पदुकोणने अलीकडेच एक निर्णय घेतला असून त्यामुळे चाहत्यांना आश्चर्य वाटले आहे. दीपिका आता 'द इंटर्न' या दीर्घकाळ चर्चेत असणाऱ्या चित्रपटाच्या भारतीय रिमेकमध्ये काम करणार नाही. ती फक्त निर्माती म्हणून या चित्रपटाशी संबंधित असेल. पडद्यामागे राहून ती चित्रपट प्रेक्षकांसमोर एका नवीन पद्धतीने सादर करू इच्छिते. त्यामुळे आता मुख्य भूमिकेसाठी नवीन अभिनेत्रीची निवड केली जाणार आहे.

दीपिकाने यापूर्वी तिच्या 'केए प्रॉडक्शन्स कंपनी' अंतर्गत चित्रपटांची सह-निर्मिती केली आहे. परंतु यावेळी ती पूर्णपणे निर्मात्याच्या भूमिकेतच दिसणार आहे. येत्या वर्षात दीपिका पाच मोठे प्रकल्प घेऊन येत असून 'द इंटर्न' त्यापैकी पहिला असेल. तिचे ध्येय अशा कथा तयार करणे आहे ज्या केवळ भारतातीलच नव्हे तर जगभरातील प्रेक्षकांशी जोडता येतील. 'द इंटर्न' २०१५ मध्ये आलेल्या हॉलिवूडमधील याच नावाच्या चित्रपटाचा भारतीय रिमेक आहे. मूळ चित्रपटात ॲन हॅथवे आणि रॉबर्ट डी नीरो यांनी मुख्य भूमिका साकारल्या होत्या. २०२० मध्ये या रिमेकची घोषणा करण्यात आली होती. त्यावेळी दीपिका ॲन हॅथवेची भूमिका साकारणार होती आणि दिवंगत अभिनेते ऋषी कपूर रॉबर्ट डी नीरोची भूमिका साकारणार होते. ऋषी कपूर यांच्या निधनानंतर ही भूमिका अमिताभ बच्चन यांना देण्यात आली. कोविड-१९ महामारी, दीपिकाची प्रसूती सुट्टी आणि इतर प्रकल्पांच्या व्यस्ततेमुळे तो अनेक वेळा पुढे ढकलण्यात आला. दीपिकाने अभिनय करण्यास नकार दिल्याने नवीन नायिकेचा शोध सुरू झाला आहे.

# कथा काळजाला भिडणारी



मराठी, हिंदी आणि दाक्षिणात्य चित्रपटांमध्ये अभिनेता सयाजी शिंदे यांनी आपल्या दमदार अभिनयाच्या बळावर चाहत्यांच्या मनावर अधिराज्य गाजवलं आहे. प्रत्येक भूमिका अगदी लीलया साकारणारे सयाजी शिंदे यांनी प्रत्येक कलाकृतीत स्वतःची छाप उमटवली आहे. आपल्या वाढदिवसाचे औचित्य साधत नुकतीच त्यांनी 'तांबव्याचा विष्णूबाळा' या महत्त्वपूर्ण चित्रपटाची घोषणा केली आहे.

सातारा जिल्ह्यातील डोंगराच्या कुशीत वसलेल्या तांबवे गावातील विष्णू बाळा पाटील यांच्या संघर्षाची कथा या चित्रपटातून उलगडणार आहे. सत्यघटनेवर आधारलेल्या, रक्तरंजित संघर्षाचा नायक असणाऱ्या विष्णूबाळाची मध्यवर्ती भूमिका सयाजी शिंदे साकारणार असून मराठी, हिंदी चित्रपटसृष्टीतील कलावंतांची मांदियाळी या भव्य चित्रपटातून आपल्या भेटीला येणार आहे.

'विश्वविनायक सिनेमॅटिक सफारी फिल्म एलएलपी प्रोडक्शन' बॅनरअंतर्गत येणाऱ्या 'तांबव्याचा विष्णूबाळा' या चित्रपटाचं लेखन अरविंद जगताप यांचं असून दिग्दर्शन अनुप जगदाळे करणार आहेत. या चित्रपटाचे निर्माते मनोहर जगताप आहेत. हा चित्रपट मराठीसोबत हिंदी, तेलुगू आणि तामिळ भाषेमध्ये प्रदर्शित होणार आहे. साताराच्या ग्रामीण भागात घडलेल्या या सूडनाट्याचा थरार जनसामान्यांना अचंबित करणारा असणार आहे, असा विश्वास सयाजी शिंदे यांनी व्यक्त केला. 'रावरंभा'च्या यशानंतर दिग्दर्शक अनुप जगदाळे आपल्या या नव्या कलाकृतीबद्दल बोलताना सांगतात की, नवीन आणि वेगळा अनुभव देणारा चित्रपट करावा असं मनात होतं. सयाजी शिंदे यांच्या साथीने ही सत्यकथा भव्यदिव्य स्वरूपात मांडण्याची कल्पना सुचली. एक वेगळ्या धाटणीचा कथाविषय आणि दमदार कलाकार यांना एकत्र पहाण्याची पर्वणी प्रेक्षकांना या चित्रपटामुळे लाभणार आहे. गावच्या भाऊबंदकीतून आणि श्रेयवादातून सख्ख्या चुलत भावांमध्ये विकोपाला गेलेला वाद आणि त्यातून कुटुंबावर झालेल्या अन्यायाचा बदला घेण्यासाठी विष्णूबाळानं केलेला रक्तरंजित संघर्ष 'तांबव्याचा विष्णूबाळा' मध्ये पहायला मिळणार आहे.

# दिशा परतण्याची अपेक्षा



दिग्दर्शक असित कुमार मोदी यांची विनोदी मालिका 'तारक मेहता का उल्टा चष्मा' आबालवृद्धांची आवडती मानली जाते. गेल्या अनेक वर्षांपासून हा शो चाहत्यांचे मनोरंजन करत आहे. यासोबतच शो मध्ये 'दया बेन'ची भूमिका प्रेक्षकांच्या पसंतीस उतरली आहे. आता ती साकारणारी अभिनेत्री दिशा वाकानी मालिकेमध्ये पुनरागमन करणार असल्याची जोरदार चर्चा आहे. या चर्चेला पुन्हा एकदा तोंड फुटण्याचे कारण म्हणजे रक्षाबंधनाच्या निमित्ताने सोशल मीडियावर आलेले दिशा वाकानीचे असित मोदीसोबतचे काही नवीन फोटो... 'तारक मेहता का उल्टा चष्मा' शो सोडल्यापासून दिशा लाइम लाइटपासून दूर आहे. दरम्यान, रक्षाबंधनाच्या खास प्रसंगी दिशाने मानलेला भाऊ आणि 'तारक मेहता' चे निर्माते असित कुमार मोदी यांना राखी बांधली आणि यावेळचा एक व्हिडिओ असितने अधिकृत इंस्टाग्राम हँडलवर शेअर केला.

या व्हिडिओमध्ये दिशा वाकानीची झलक बऱ्याच दिवसांनी दिसली. यामध्ये दिशाची मुलगीही दिसते आहे. पोस्टच्या कॅप्शनमध्ये असित मोदी यांनी लिहिले आहे की, काही नाती नशिबानेच विणलेली असतात. ती रक्ताची नसून हृदयाची असतात. दिशा वाकानी केवळ आमची दया भाभीच नाही तर माझी बहीण देखील आहे. वर्षानुवर्षे हास्य, आठवणी आणि आपुलकी शेअर करणारे हे नाते पडद्याच्या पलीकडे गेले आहे. या राखीवर तोच अतूट विश्वास, आपुलकी पुन्हा जाणवली. आमच्यातील हे प्रेमळ बंधन नेहमीच गोडव्याने आणि ताकदीने टिकून राहो... दिशा वाकानीची असित मोदीसोबतची झलक बऱ्याच दिवसांनी पाहिल्यानंतर चाहत्यांनी तिला 'तारक मेहता का उल्टा चष्मा' मध्ये परतण्याची मागणी करण्यास सुरुवात केली आहे. एका युजरने कमेंट करत लिहिले, प्लीज दिशा जी, 'तारक मेहता'कडे परत या. आम्हाला तुमची खूप आठवण येते. अशाप्रकारे अनेक युजर्स प्रतिक्रिया देत आहेत.

# डॉ. निलेश साबळे आणि 'चला हवा येऊ द्या!

धनंजय शेटये





डॉ. निलेश साबळे म्हणजे एक प्रतिभावंत अष्टपैलू व्यक्तिमत्व आहे. मराठी कलाक्षेत्रात त्यांचा अभिनय, लेखन, दिग्दर्शन, सुत्रसंचलन, हुबेहूब मिमिक्री हे सर्व करणारा त्यांच्या एवढा प्रतिभावंत कलाकार अजून कोणीही निर्माण झाला नाही. गेली दहा वर्षे 'चला हवा येऊ द्या' हा अतिशय लोकप्रिय कार्यक्रम टी. आर.पी. च्या मानांकन यादीत सर्वोच्च स्थानावर नेण्यात त्यांचे कमालीचे कौशल्य आणि योगदान आहे. डॉ. निलेश साबळे हा केवळ कलावंतच नाही तर उत्तम गुणग्राहक दिग्दर्शक आहेत. भाऊ कदम, कुशल बद्रिके, सागर कारंडे, श्रेया बुगडे, भारत गणेशपुरे यांच्या अभिनयाला आकार देऊन अभिनयाच्या सर्वोच्च शिखरावर नेऊन विराजमान केले. साबळेना अजिबात गर्व नाही. मराठी चित्रपट, मालिका क्षेत्रात एवढा हुकमी एक्का म्हणून आजतागायत कोणीच नावारुपाला आला नव्हता. मराठी स्टँड-अप कॉमेडीला एक ऐतिहासिक स्थान निर्माण केले.

**'कोण होणार महाराष्ट्राचा सुपरस्टार?'**

या कार्यक्रमात संकर्षण कऱ्हाडे, अभिजित खांडकेकर आणि डॉ. निलेश साबळे यांनी सहभाग घेतला होता तो त्या तिघांचाही पहिला रियालिटीशो होता. त्या कार्यक्रमाचे परीक्षक महेश मांजरेकर होते. या कार्यक्रमातून तिघेही नावारूपाला आले तिघेही प्रचंड कौशल्यवान होते. त्या तिघांमध्ये डावा उजवा करणे अशक्य! कारण तिघांची प्रतिभा विलक्षण आहे. पण डॉ. निलेश साबळे 'फु बाई फू' या कार्यक्रमाच्या सुत्रसंचलन करताना यशाच्या अत्युच्च शिखरावर पोहोचला.

त्यांच्या 'हवा येऊ द्या' या कार्यक्रमाची बॉलिवुडच्या कलावंतांनाही भुरळ पडली. शाहरुख खान, अक्षय कुमार, माधुरी दिक्षित, श्रीदेवी अनिल कपूर यांनी या कार्यक्रमाचे भरभरुन कौतुक केले. क्रिकेटचा देव सचिन तेंडुलकर यांना 'चला हवा येऊ द्या' या कार्यक्रमात निमंत्रित अरविंद जगताप लिखित जे पत्र सादर केले त्यावेळी अनेकांच्या डोळ्यात अश्रू उभे राहिले. निलेश साबळेंसारखा प्रतिभावंत कलाकार, निवेदक, लेखक, मिमिक्री आर्टिस्ट मराठी चित्रपट सृष्टीला लाभला हे महाराष्ट्राचे अहो भाग्य!

'चला हवा येऊ द्या' या कार्यक्रमाचा आत्मा म्हणजे डॉ. निलेश साबळे! पण त्यांनाच या कार्यक्रमात प्रेक्षकांना पाहता येत नसेल तर तो कार्यक्रम प्रेक्षक कसे पाहतील? खरंतर प्रियदर्शन जाधव, संतोष पवार हे मराठी कलाक्षेत्रातील अष्टपैलू व्यक्तिमत्त्व असलेले प्रतिभावंत कलाकार आहेतच पण 'चला हवा येऊ द्या' या कार्यक्रमात दुसरा कोणताही अष्टपैलू कलाकार आला तरी डॉ. साबळे यांची जागा घेऊ शकत नाही.

साबळे यांना चित्रपट किंवा मालिका या क्षेत्रात चरित्र अभिनेता म्हणून लोक स्वीकारतील याबाबत मात्र शंका आहे. कारण स्टॅण्ड अप कॉमेडीचा शिक्का बसलेला कलावंतांचा चित्रपट क्षेत्रातील अभिनयाचा प्रवास पार्ट टाईम बॉलरसारखा असतो. अगदी शेखर सुमन, अन्नु कपूर किंवा अलिकडच्या काळातील कपिल शर्मा असो अशा सर्वच कलाकारांना चित्रपटप्रेक्षक फारसे स्वीकारत नाहीत. ही गोष्ट सुद्धा तितकीच खरी आहे.

**अष्टपैलू कलावंत : डॉ. निलेश साबळे**

मराठी मनोरंजन सृष्टीत असे काही कलाकार आहेत, जे केवळ एकाच भूमिकेत रमले नाहीत, तर विविध कलांमधून त्यांनी प्रेक्षकांच्या मनात घर केले. यापैकीच एक महत्त्वाचे नाव म्हणजे डॉ. निलेश साबळे. एक यशस्वी डॉक्टर, उत्तम सूत्रसंचालक, संवेदनशील लेखक, कसदार दिग्दर्शक आणि विनोदी अभिनेता अशा अनेक भूमिका त्यांनी एकाच वेळी लीलया सांभाळल्या.

'चला हवा येऊ द्या' या लोकप्रिय कार्यक्रमामुळे निलेश साबळे घराघरात पोहोचले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करताना त्यांचा शांत आणि हसमुख स्वभाव प्रेक्षकांना खूप भावला. केवळ सूत्रसंचालनच नाही, तर या कार्यक्रमाची निर्मिती आणि दिग्दर्शनही त्यांनी केले. मराठीतील अनेक दिग्गज कलाकारांना एकत्र आणून त्यांनी 'चला हवा येऊ द्या'ला महाराष्ट्राचा लाडका कार्यक्रम बनवले. या शोमधील त्यांचे विविध स्किट आणि विनोदी लेखन नेहमीच चर्चेत राहिले. अभिनयाच्या क्षेत्रातही निलेश साबळे यांनी आपली छाप सोडली आहे. त्यांनी 'युवा डान्सिंग क्वीन' सारख्या कार्यक्रमांचे सूत्रसंचालन केले. तसेच, दिग्दर्शक म्हणून त्यांनी 'मराठा तितुका मेळवावा' या ऐतिहासिक चित्रपटाची निर्मिती करून आपली वेगळी ओळख निर्माण केली. एका डॉक्टरने मनोरंजन क्षेत्रात इतके मोठे यश मिळवणे हे निश्चितच प्रेरणादायी आहे. वैद्यकीय शिक्षण घेतल्यानंतरही कलेची आवड त्यांनी जोपासली आणि त्यातही अव्वल ठरले.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ. सुप्रिया पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ I MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग- email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)

# लोकाभिमुख महाराष्ट्र घडवणार-आदिती तटकरे

## विविध उपक्रमांतून जिल्ह्यात स्वातंत्र्यदिन साजरा

**| अलिबाग | प्रतिनिधी |**

**महाराष्ट्राचा सर्वांगीण विकास या एकमेव अजेंड्यावर राज्य शासन काम करत आहे. राज्याला देशातच नव्हे, तर जागतिक स्तरावर नेण्यासाठी आगामी पाच वर्षांसाठी एक ठोस आणि सर्वसमावेशक व्हिजन निश्चित केले आहे. आज आपण ज्या संधी आणि आव्हानांसमोर उभे आहोत, त्यावर मात करत एक स्थिर, समृद्ध, आणि लोकाभिमुख महाराष्ट्र घडवण्याची प्रक्रिया सुरू झालेली आहे, असे प्रतिपादन महिला व बालविकास मंत्री आदीती तटकरे यांनी केले.**

अलिबागमधील जिल्हा पोलीस मुख्यालयाच्या प्रांगणात ७८ वा स्वातंत्र्य दिन साजरा करण्यात आला. मुख्य ध्वजारोहणाच्या कार्यक्रमानंतर मार्गदर्शन करताना आदिती तटकरे बोलत होत्या.

यावेळी जिल्हाधिकारी किशन जावळे, मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, जिल्हा पोलीस अधिक्षक आचल दलाल, उप वनसंरक्षक राहुल पाटील, अपर पोलीस अधिक्षक अभिजित शिवथरे, अपर जिल्हाधिकारी सुनील थोरवे, आदींसह वेगवेगळ्या विभागातील अधिकारी, कर्मचारी व नागरिक उपस्थित होते.

यावेळी आदिती तटकरे यांनी स्वातंत्र्य दिनाच्या शुभेच्छा देत, देशासाठी आपले प्राण अर्पण केलेल्या ज्ञात अज्ञात स्वातंत्र्यवीर, शहीद यांना वंदन केले. पुढे त्या म्हणाल्या की, नागरिकांच्या आशा-आकांक्षांचा विचार करून विकास प्रक्रियेत त्यांचा सक्रिय सहभाग, दूरदृष्टी ठेवून योग्य नियोजन, जगातील अत्याधुनिक संकल्पना तंत्रज्ञानाचा वापर, उत्पन्नाच्या स्रोतात वाढ आणि विकास प्रकल्पांच्या गतीने पूर्णत्वासाठीचा पाठपुरावा या माध्यमातून भविष्यातील विकसित रायगड जिल्हा साकारला जाईल. आर्थिक विकास, पायाभूत सुविधा, शिक्षण, आरोग्याच्या सोयीसुविधा, रोजगार निर्मिती, ग्रामीण रस्ते, महामार्ग, रेल्वे मार्ग, मेट्रो, विमानतळ, जलमार्ग यांसारख्या सुविधांना अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले आहे. त्यामुळे पायाभूत सुविधांच्या उभारणीसाठी दिला जाणारा निधी हा केवळ खर्च नसून ती भविष्यासाठी केलेली गुंतवणूक बनली आहे.

### कर्तृत्ववानांचा सन्मान

**स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने जिल्ह्यातील वेगवेगळ्या क्षेत्रातील कर्तृत्ववान व्यक्तींचा सन्मान करण्यात आला. अवयव दाते, पाचवी व आठवी शिष्यवृत्ती परिक्षा २०२५ प्रमाणपत्र, सैनिक नायक पदक (ताम्रपटांचे वितरण) २०२५, नगरपरिषद आस्थापनेवरील अनुकंपा तत्वावरील नियुक्ती आदेशाचे, आपत्ती प्रसंगी सहकार्य करणाऱ्या संस्था आणि व्यक्ती तसेच १०० दिवसाच्या कार्यालयीन सुधारणा विशेष मोहीम दुसरा टप्पा निवड झालेल्याकार्यालयाना पुरस्काराचे वितरण करण्यात आले.**

### जिल्हा बळकटीसाठी सहकार्य करा

**शासन ग्रामीण विकासाच्या दिशेने ऐतिहासिक पाऊल टाकत मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान सुरू करत आहे. हे अभियान केवळ स्पर्धात्मक नसून, ग्रामविकासाच्या लोकचळवळीला चालना देणारे महत्त्वाचे माध्यम ठरेल. गावागावात सुशासन प्रस्थापित करणे, आत्म निर्भरता निर्माण करणे,आणि विकासाची स्पर्धात्मक भावना रुजवणे हा मुख्य उद्देश आहे. योजना केवळ प्रशासकीय यंत्रणा पुरती मर्यादित नसून, ग्रामस्थांच्या प्रत्यक्ष सहभागावर आधारलेली आहे. प्रत्येक गाव, पंचायत आणि नागरिकाने हे अभियान आपले समजून काम केले तर गावाचा चेहरामोहराच बदलू शकतो. त्यामुळे जिल्ह्यातील ग्राम पंचायत, पंचायत समिती आणि जिल्हा परिषद यांनी सक्रिय सहभाग नोंदवा. जिल्हा बळकट करण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन आदिती तटकरे यांनी केले.**



## पीएनपी एज्युकेशन सोसायटीच्या संकुलात ध्वजारोहण

**| अलिबाग | प्रतिनिधी |**

भारतीय स्वातंत्र्याच्या ७९ व्या वर्धापन दिनानिमित्त रायगड जिल्हयात मोठ्या उत्साहात ध्वजारोहण समारंभ साजरा करण्यात आला. जिल्हयातील पीएनपीच्या ग्रामीण भागातील विविध शाळां व कॉलेजमध्ये सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

अलिबाग तालुक्यातील वेश्वी येथील पीएनपी एज्युकेशन सोसायटीच्या संकुलात ध्वजारोहणाचा कार्यक्रम साजरा करण्यात आला.

पीएनपी होली चाईल्ड सीबीएसई शाळेच्या मुख्याध्यापिका वेल्लईम्मल्ल वेणी यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी महाविद्यालयाचे प्रशासन अधिकारी गाबाजी गीते, माध्यमिक शाळेचे मुख्याध्यापक निलेश मगर, होली चाईल्ड स्टेट बोर्डच्या मुख्याध्यापिका निसर्गा चेवले, प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका रिना म्हात्रे, पीएनपी कॉलेजचे प्राचार्य डॉ. ओमकार पोटे, प्राचार्य रविंद्र पाटील, बी. एड कॉलेजच्या प्राध्यापक रुतिषा पाटील, महाविद्यालयाचे संचालक विक्रांत वार्डे, मुख्य कार्यालयाचे लेखापाल अंकित भानुशाली, जनसंपर्क अधिकारी अमोल नाईक, क्रीडा प्रशिक्षक तेजस म्हात्रे, अक्षय डाकी इतर मान्यवर, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी आदि मोठ्या संख्येने उपस्थित होते.यावेळी विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीतांवर नृत्याविष्काराचे सादरीकरण केले.



## सुतारवाडी परिसरात स्वातंत्र्यदिन साजरा

**सुतारवाडी :** भारतीय स्वातंत्र्याचा ७९ वा वर्धापन दिन कुडली विभागातील प्राथमिक शाळा येरळ, कुडंली सुतारवाडी, धगडवाडी, पाथर शेत, दुरटोली, जामगाव, कामत, गौळवाडी, आंबिवली, आंबिवली आदिवासी वाडी, पाथरशेत आदिवासी वाडी, या प्राथमिक शाळांमध्ये तसेच द.ग. तटकरे माध्यमिक विद्यालय सुतारवाडी, आदर्श माध्यमिक विद्यालय कुंडली सरफळेवाडी या माध्यमिक विद्यालयांमध्ये संचलनाद्वारे राष्ट्रीय ध्वजाला मानवंदना देण्यात आली. ग्रामपंचायत येरळ, ग्रामपंचायत कुडली, तसेच ग्रामपंचायत जामगाव या ठिकाणीही भारतीय स्वातंत्र्याचा एकूण ७९ वा स्वातंत्र्य दिन अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत साजरा करण्यात आला.



## जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या हस्ते ध्वजारोहण




**| रायगड | प्रतिनिधी |**

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रांगणात स्वातंत्र्यदिनाच्या ७८ व्या वर्धापनदिनी ध्वजारोहण जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या हस्ते उत्साहात संपन्न झाले.

यावेळी अपर जिल्हाधिकारी सुनिल थोरवे, निवासी उपजिल्हाधिकारी संदेश शिर्के, उपजिल्हाधिकारी डॉ रविंद्र शेळके, श्रीकांत गायकवाड, रविंद्र राठोड जिल्हा नियोजन अधिकारी उमेश सुर्यवंशी, जिल्हा पुरवठा अधिकारी सर्जेराव सोनावणे, उपविभागीय अधिकारी मुकेश चव्हाण, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी सागर पाठक, तहसिलदार विक्रम पाटील यासह जिल्हाधिकारी कार्यालयातील विविध शाखांचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

## डॉ. नितीन गांधी यांच्या हस्ते जेएसएसचे ध्वजारोहण

**| अलिबाग | प्रतिनिधी |**

स्वातंत्र्यदिनी जन शिक्षण संस्थान रायगडचे अध्यक्ष डॉ. नितीन गांधी यांच्या शुभ हस्ते जेएसएस रायगडचा ध्वजारोहण कार्यक्रम मुख्य पर्यावरण पूरक व्यवसाय प्रशिक्षण केंद्र सहाण अलिबाग या ठिकाणी संपन्न झाला. सदर कार्यक्रमाप्रसंगी प्रत्येक भारतीय नागरिकांनी सार्वजनिक ठिकाणी थुंकणे टाळायला हवे यातून प्रदूषणाला मोठ्या प्रमाणावर आळा घालता येईल व सार्वजनिक आरोग्य टिकवता येईल असे मत डॉ नितीन गांधी यांनी कार्यक्रमाप्रसंगी व्यक्त केले.

संस्थापक अध्यक्षा डॉ. मेधा सोमैया व व्यवस्थापन मंडळ यांच्या मार्गदर्शनाखाली संस्था रायगड जिल्ह्याभरात व्यवसाय प्रशिक्षणाचे काम मागच्या २० वर्षापासून यशस्वीरित्या करीत आहे ह्याच उपक्रमाचा एक भाग म्हणून स्वातंत्र्यासाठीचा त्याग व बलिदाना करणाऱ्या स्वातंत्र्यवीरांचा समाजाला विसरपडू नये या दृष्टिकोनातून जेएसएस रायगडच्या माध्यमातून हर घर तिरंगा उपक्रमाच्या माध्यमातून केलेल्या कार्याचे कौतुक संचालक डॉ. विजय कोकणे यांच्या माध्यमातून करण्यात आले. त्याचबरोबर सदर कार्यक्रमाप्रसंगी सीएसआर जेएनपीटी मुंबईद्वारा आयोजित बॅग मेकिंग कार्यशाळेच्या यशस्वी विद्यार्थ्यांना प्रशस्तीपत्रकाचे वाटप करण्यात आले.

सदर ध्वजारोहण कार्यक्रमाच्या शुभप्रसंगी जेएसएस रायगडचे अध्यक्ष डॉ. नितीन गांधी, उपाध्यक्षा रत्नप्रभा बेल्हेकर, संचालक डॉ. विजय कोकणे या व्यवस्थापक मंडळाबरोबरच माणुसकी प्रतिष्ठानचे राजाराम हुलवान, उज्ज्वल भविष्य सामाजिक संस्थेच्या अध्यक्षा उज्ज्वला चंदनशिव, कल्पना म्हात्रे व भाग्यश्री पुसाळकर, रेखा घरत, रिद्धी पाटील, प्रांजल पाटील, अजय पाटील, हिमांशू भालकर, नवनाथ पोईलकर, भारती पोईलकर हे कर्मचारी, प्रशिक्षणार्थी व ग्रामस्थ प्रतिनिधी देखील ध्वजारोहण कार्यक्रम राबवित असताना उपस्थित होते.

## खांदा कॉलनीत झेंडावंदन उत्साहात

**पनवेल :** शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षातर्फे खांदा कॉलनी शिवसेना शहर शाखेत १५ ऑगस्ट मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. खांदा कॉलनीचे शहर प्रमुख सदानंद शिर्के यांच्या हस्ते झेंडावंदन करण्यात आले. यावेळी प्रमुख उपस्थिती शिवाजी दांगट, संतोष जाधव, दत्तात्रय महामुलकर, सुनील महामुनी, शिवाजी बंडगर सचिन धाडवे, सुनील आवटी, राजू डेरे, दीपक चांदिवडे, शशिकांत सोनवणे, अर्चना शिरसागर यांच्यासह आजी-माजी पदाधिकारी आणि खांदा कॉलनीतील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पावसातही स्वातंत्र्यदिनाचा उत्साह कायम

**| अलिबाग| वैष्णवी वाडकर|**

अनेक दिवसांपासून विश्रांती घेतलेल्या पावसाने तालुक्यात पुन्हा एकदा हजेरी लावली आहे. गेल्या काही तासांपासून मुसळधार पावसाने अक्षरश: थैमान घातले आहे. या पावसामुळे तालुक्यातील अनेक रस्ते पाण्याने भरले. त्यामुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे. एवढ्या जोरदार पावसात देखील तालुक्यातील स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

शाळा, महाविद्यालयांसह पावसात भिजत ध्वजारोहण, देशभक्तीपर नृत्यांचे सादरीकरण करण्यात आले. त्यामुळे पावसातही स्वातंत्र्यदिनाचा उत्साह कायम दिसून आला. अलिबाग तालुक्यामध्ये भारताचा ७९वा स्वातंत्र्यदिन मोठ्या उत्साहात सर्वत्र साजरा करण्यात आला. अलिबाग शहरात मुख्य ध्वजारोहण सोहळा पोलीस मुख्यालयात महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांचा हस्ते करण्यात आले. तालुक्यातील रेवदंडा, नागाव, चौल, महाजने, बेलोशी, दिवीवाडी येथील विविध शाळा, महाविद्यालये, ग्रामपंचायत व शासकीय कार्यालयांमध्ये ध्वजारोहणचा कार्यक्रम पार पडला. पावसाच्या सरींमध्ये विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक कार्यक्रम, देशभक्तीपर गीते परेड व भाषणांद्वारे देशाला मानवंदना दिली. पावसाच्या मुसळधार थेंबांमध्ये फडकणारा तिरंगा आणि त्यासाठी जमलेल्या लोकांचा उत्साह, हा स्वातंत्र्यदिनाचा अविस्मरणीय क्षण ठरला.





● स्वातंत्र्य दिनानिमित्त चिंतामणराव केळकर विद्यालयात अमर वार्डे यांच्या हस्ते ध्वजारोहण

## ज्ञानांकुर स्कूलमध्ये स्वातंत्र्यदिन साजरा

**| कोलाड | वार्ताहर |**

खांब विभागात इंग्रजी शिक्षण क्षेत्रात अग्रेसर असलेल्या मंजुळा वेल्फेअर अँड सोसायटीचे ज्ञानांकुर इंग्लिश मिडीयम स्कूलमध्ये ७९ वा स्वातंत्रदिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. संपूर्ण शाळा येथील विद्यार्थ्यांनी विविध ज्ञान विज्ञान प्रतिकलाकृती साकारून रंगी बेरंगी फुलांची सजावटीत उजळून निघाली होती.

खांब विभागातील सामाजिक कार्यकर्ते तथा शिक्षणप्रेमी महाराष्ट्र विद्युत महामंडळ क्षेत्रातून सेवा निवृत तसेच खांब पंचक्रोशीतील कीर्तनकार ज्ञानेश्वर लोखंडे यांच्या शुभहस्ते या शाळेचा ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी संस्थेचे अध्यक्ष रविंद्र लोखंडे, नारायण लोखंडे, संचालक डॉ. श्याम लोखंडे, दिलीप मोहिते, पालक तुकाराम कोंडे, संतोष महाडिक, गणेश कोस्तेकर, प्रदीप मरवडे, सचिन गोळे, विक्रांत गुरव, सूर्यकांत पोटफोडे, अमित भोईर, प्रवीण पोटफोडे, हरिश्चंद्र लोखंडे, महेंद्र वाघमारे, आरती तुपकर, प्रकाश कोकाटे, अर्चना परबळकर, माधवी चितळकर, शाळेच्या मुख्याध्यापिका रिया लोखंडे, शिक्षिका सोनाली शिंदे, रुपाली मरवडे, प्रियांका चिकने, प्रतीक्षा धामणसे, सायली म्हात्रे, जान्हवी महाडिक, दर्शना धनवी, क्रीडा शिक्षक ज्ञानेश्वर महाडिक, निलेश टवळे, श्रुती वाजे आदी उपस्थित होते.

१५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून येथील विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर विविध गीत तसेच पथ नाट्य आणि देश स्वातंत्र्य काळात ज्या ज्या हुतात्म्यांनी देशासाठी बलिदान दिले अशा थोर विरांबद्दलची महती पटवून दिली तसेच पालक संतोष महाडिक, डॉ. श्याम लोखंडे, संस्थेचे अध्यक्ष रविंद्र लोखंडे, ज्ञानेश्वर लोखंडे यांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. अध्यक्ष रविंद्र लोखंडे यांनी सांगितले की शाळेत शिक्षणाबरोबरच वेगवेगळ्या प्रकारची कला, क्रीडा तसेच भारतीय संस्कृतीला आधारित उपक्रम राबविण्यात येत असून यात राज्यस्तरावर विद्यार्थ्यांची मौलिक कामगिरी केली आहे. ध्वजारोहण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यार्थिनी भक्ती चितळकर, स्वरा धामणसे यांनी केले.





● संत नामदेव माध्यमिक विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय नांदगाव येथे संस्थेचे अध्यक्ष सुरेश खैरे ध्वजारोहण करताना.

### निवृत्त कर्नल डॉ. कुशाग्र पटेल यांची खंत | मध्यरात्री नेरळ येथे ध्वजारोहण

# स्वातंत्र्य अजून पूर्ण मिळालेले नाही

**| नेरळ | प्रतिनिधी |**

देशाला स्वतंत्र मिळून ७९ वर्षे पूर्ण होत आहेत, मात्र तरी देखील आपल्याला संपूर्ण स्वातंत्र्य अद्याप मिळाले नाही असे वाटते. त्यासाठी तरुण वर्गाने देशाचा इतिहास समजून घेतला पाहिजे आणि आपला देश बलवान करण्यासाठी पुढे यायला हवे, असे आवाहन भारतीय सेनेतील निवृत्त कर्नल डॉ. कुशाग्र पटेल यांनी केले. नेरळ येथील हुतात्मा चौकात आयोजित मध्यरात्रीचे ध्वजारोहण केल्यानंतर जमलेले शेकडो तरुणांना देशात प्रत्येकाला संपूर्ण मिळवून देण्याचे आवाहन केले.

हुतात्मा स्मारक समितीचे वतीने माथेरान नेरळ कळंब राज्यमार्ग रस्त्यावरील माथेरान नाका येथे असलेल्या हुतात्मा चौक येथे भारताचा स्वातंत्र्य दिनाचा सोहळ्याचे आयोजन केले होते. मध्यरात्री बारा वाजून एक मिनिटांनी तिरंगा ध्वज फडकावून स्वातंत्र्यदिन साजरा करण्याची २२ वर्षाची परंपरा आहे. रात्री अकरा वाजता देशप्रेमी तरुणांनी मशाल फेरी काढली, त्यात हुतात्मा चौक येथून निघालेली मशाल फेरी कर्जत कल्याण रस्त्याने जकात नाका, गजाना महाराज मंदिर, ब्रिटिशकालीन धरण मार्गे नेरळ ग्रामपंचायत अशी पुढे धारप सभागृह मार्गे कुंभार आळी आणि तेथून छत्रपती शिवाजी महाराज चौक येथून माथेरान रस्त्याने हुतात्मा हिराजी पाटील चौक, लोकमान्य टिळक चौक अशी गणेश मंदिर मार्गे पुन्हा हुतात्मा चौकात पोहचली.त्यानंतर बारा वाजून एक मिनिटांनी भारतीय सेनेचे निवृत्त कर्नल डॉ कुशाग्र पटेल यांचे हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

त्यावेळी नेरळ परिसर आणि कर्जत तालुक्यात दहावीमध्ये प्रथम आलेली आर्या सुर्वे हिचा सत्कार करण्यात आला. ध्वजारोहण केल्याबद्दल नेरळ पोलीस ठाण्याचे उप निरीक्षक गच्चे यांचे हस्ते सन्मान करण्यात आला. या प्रसंगी व्यासपीठावर सुधाकर देसाई, प्रथमेश मोरे, अंकुश शेळके, नम्रता कांदळगावकर, राजेश मिरकुटे, मिलिंद विरले, श्रद्धा कराळे, किसन शिंदे, डॉ. शेवाळे, बंडू क्षीरसागर तसेच सुभाष नाईक हे विविध राजकीय पक्षाचे प्रमुख उपस्थित होते. या कार्यक्रमात बोलताना दहावीमध्ये कर्जत तालुक्यात पहिली आलेली आर्या हिने मध्यरात्रीदेखील एवढ्या मोठे संख्येने लहान विद्यार्थी उपस्थित असतात ही बाब आनंद देणारी आणि देशाचा इतिहास खऱ्या अर्थाने जतन केले जाऊ शकते याची खात्री देणारी असल्याचे मनोगत व्यक्त केले.

डॉ. कुशाग्र पटेल यांनी आज आम्हाला १६ वर्षे भारतीय लष्करात केल्या जाणाऱ्या सेवेतील रात्रीच्या जागता पहारा याची आठवण झाली. मध्यरात्री बारानंतर देखील या ठिकाणी तरुणांचा उत्साह पाहून आपल्याला आपली सेवा सार्थकी लागली असे मत मांडले.

यावेळी दिलीप बोरसे, गोरख यांनी आपली देशभक्तीपर भाषणे केली तर चंद्रकांत काळे यांनी महाराष्ट्र राज्य गीत आपल्या पहाडी आवाजात सादर करून वातावरण प्रफुल्लीत केले.

हुतात्मा स्मारक समितीचे संतोष पेरणे, दर्वेश पालकर, अभिषेक कांबळे, गणेश पवार, किशोर गायकवाड, महेश भगत, चंद्रकांत काळे, बंटी शिर्के, रामदास माळी, अरुण बैकर आदींसह स्मारक समितीचे सहयोगी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## भारताचा स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा

**माथेरान :** १५ ऑगस्ट भारतीय स्वातंत्र्य दिनाचा ७८ वा वर्धापनदिन ग्रामस्थांच्या उपस्थितीत साजरा करण्यात आला. सकाळी पावणेआठ वाजता मुस्लिम मोहल्ला येथे ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते जहुर चिपाडे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

त्यानंतर संत रोहिदास महाराज नगर येथे चर्मकार समाजाचे माजी अध्यक्ष गजानन अबनावे यांच्या हस्ते, श्रीराम चौकात उद्योजिका विनिता गुप्ता यांच्या हस्ते, प्राथमिक शाळेत मुख्याध्यापक दिलीप अहिरे, अधीक्षक कार्यालयात अधीक्षक सुरेंद्र ठाकूर यांच्या हस्ते, नगरपरिषदेच्या कार्यालयासमोर नायब तहसीलदार सचिन राऊत यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. असेंब्ली हॉल येथे नगरपालिका अधीक्षक सदानंद इंगळे यांच्या हस्ते हुतात्मा भाई कोतवाल यांच्या घरासमोर मेघा कोतवाल यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.